ISSN (Print) : Applied...

पुणे.
जीवन शिक्षण
वर्ष : ६८, अंक : ८
नोव्हेंबर, २०२३ (मासिक)
किंमत – रु. ३०/–
पृष्ठे ४४

Pune
Jeevan Shikshan
Vol. : 68, Issue : 8
November, 2023 (Monthly)
Price - ₹ 30/-
Pages 44

# जीवन शिक्षण

## शुभ दीपावली















ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील इंग्रजी भाषा विभागामार्फत इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'My Graded Readers' निर्मितीसाठी दि. १८ ते २१ ऑक्टोबर, २०२३ दरम्यान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपसंचालक, डॉ. कमलादेवी आवटे, श्री. अरुण सांगोलकर, विभागप्रमुख (इंग्रजी भाषा), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता तसेच राज्यभरातून इंग्रजी भाषातज्ज्ञ उपस्थित होते.



'School Quality Assessment and Accreditation Framework' (SQAAF) विकसन कार्यशाळा दि. २७ ऑक्टोबर व २८ ऑक्टोबर, २०२३ रोजी संपन्न झाली. याप्रसंगी राज्यातील विविध तज्ज्ञांनी सहभाग घेतला.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
ज्ञानसेवा तु साफल्यम्

# जीवन शिक्षण

❖ मूल्य : रु. ३०/-
❖ वार्षिक वर्गणी : रु. ३००/-
❖ प्रती : ५७,२५०

वर्ष ६८ | नोव्हेंबर, २०२३ | अंक ८ वा

❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**अमोल येडगे** (भा.प्र.से.), संचालक **अध्यक्ष**

**रमाकांत काठमोरे**, सहसंचालक **कार्यकारी संपादक**

**डॉ. दीपक माळी**, प्रशासन अधिकारी तथा प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम **सहसंपादक**

**डॉ. कमलादेवी आवटे**, प्राचार्य, भाषा आणि समन्वय **सदस्य**

**डॉ. शोभा खंदारे**, प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. **सदस्य**

**ज्योती उपाशी**, सहा. संचालक, लेखा **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव**, वरिष्ठ अधिव्याख्याता **सदस्य**

**सचिन चव्हाण**, वरिष्ठ अधिव्याख्याता **सदस्य**

❖ **निर्मिती सहायक :**

**अरुण जाधव**,
अधिव्याख्याता, सी.पी.डी. व प्रसारमाध्यम विभाग

**अपर्णा शेंडकर**,
अधीक्षक (वर्ग-२) प्रसारमाध्यम

❖ **संपादन मंडळ :**

माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले, सलिल वाघमारे.

❖ **संपादक :**

**अरुण सांगोलकर**, वरिष्ठ अधिव्याख्याता तथा **सदस्य सचिव**
विभाग प्रमुख (प्रसारमाध्यम, इंग्रजी आणि उर्दू)

## अंतरंग

| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | – | ४ |
| ❖ शालेय दिनदर्शिका | शिवाजी खोपडे | ५ |
| ❖ शालेय व्यवस्थापन समिती काय करू शकते? | मारोती कदम | ७ |
| ❖ जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण – काळाची गरज | पल्लवी शिरोडे | ८ |
| ❖ माझा वाढदिवस पुस्तकासोबत | सुप्रिया ताकभाते | ११ |
| ❖ 'प्रेरणा दिन' उपक्रमाने संचारले नवचैतन्य | राहुल कळंबे | १३ |
| ❖ इंग्रजी अध्यापनातील प्रयोग | सुनीता इंगळे | १५ |
| ❖ माझा वर्ग माझे उपक्रम | योगिता सोनवणे | १७ |
| ❖ एक पाऊल प्लॅस्टिक मुक्ततेकडे | विभावरी कांबळे-साळवे | २० |
| ❖ उपक्रमांच्या दुनियेत | नीलम सुंबे | २१ |
| ❖ शाळेतील परसबाग घरोघरी | सचिन दरेकर | २३ |
| ❖ पर्यावरणस्नेही दिवाळी | डॉ. शिवनंदा मेहेत्रे | २५ |
| ❖ रद्दीतून बुद्धीला चालना | बाळकृष्ण बाचल | २७ |
| ❖ मूल्यमापन आणि कोवळ्या वयातील भय | सुरेंद्र करवंदे | २९ |
| ❖ गोष्ट छोटी डोंगराएवढी | खंडू मोरे | ३१ |
| ❖ करूया मनोरंजन मुलांचे | पी. एम. काळे | ३३ |
| ❖ थोडी गंमत | नंदा कुलकर्णी | ३५ |
| ❖ मुलांचा अमूल्य खजिना | युवराज माने | ३६ |
| ❖ Five Techniques of Teaching English | Sujit Falke | ३९ |
| ❖ इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ४२ |

'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक अरुण सांगोलकर यांनी रुना ग्राफिक्स, स. नं. ६४, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव (बु.), सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : अरुण सांगोलकर.

'Jeevan Shikshan' monthly publication is owned by Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, Printed and Published by Arun Sangolkar, Printed at Runa Graphics, S. No. 64, Behind Trimurti Hospital, Vadgaon (Bk.), Sinhagad Road, Pune - 411 041 and Published at Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Pune 411 030. Editor : Arun Sangolkar.

**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in **वेब लिंक :** https://scertmaha.ac.in/jeevanshikshan/

*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....



मित्रहो,

शिक्षण म्हणजे केवळ अक्षर–ओळख, गणितीय क्रिया, परीक्षेतील गुण, घोकंपट्टी, वर्गात पहिला–दुसरा नंबर, पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठी नोकरी मिळवण्याकरिता व्यक्तीला तयार करणे एवढेच नाही. ही केवळ शिक्षणापासून मिळणारी भौतिक साधने आहेत. सर्व मुलामुलींना एकाच साच्यात घालून एका छापाचे विद्यार्थी तयार करणे म्हणजे शिक्षण नाही. प्रत्येक विद्यार्थी हा वेगळा आणि खास आहे, अशी खूणगाठ मनाशी बांधणे आवश्यक आहे. एकाची दुसऱ्याशी तुलना न करता विद्यार्थ्यांना फक्त परीक्षार्थी होण्यापासून रोखणे आवश्यक आहे.

खरे तर, शिक्षण म्हणजे 'स्व' ची ओळख. 'मी कोण' यासंबंधीची जिज्ञासा आणि त्याचे उत्तर म्हणजे शिक्षण. उमलत्या वयात प्रत्येक मूल बुद्धिमान असतेच; फक्त त्याची बुद्धी कोणत्या क्षेत्रात जास्त खुलते, जास्त कार्यक्षमतेने चालते हे शिक्षकांनी शोधायला हवे. विद्यार्थ्याला आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायांवर उभे राहायला सक्षम करणे, हेही शिक्षणपद्धतीचे किमान उद्दिष्ट आहे, मात्र ते एकमेव उद्दिष्ट नाही. पाय जमिनीवर ठेवून आभाळ कवेत घेण्याची स्वप्न पाहायला विद्यार्थ्याला प्रेरित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. स्वतःच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्याला समता, बंधुता ही आदर्श मानवीमूल्ये जपणारा एक संवेदनशील नागरिक बनवणे हेही शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण सर्व जण मिळून प्रयत्नशील राहूया आणि एक आदर्श समाज तयार करण्यात आपला वाटा उचलूया !

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १४ नोव्हेंबर हा जन्मदिवस आहे. हा दिवस आपण 'बालदिन' म्हणून साजरा करतो. भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकट रमण आणि थोर साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचेही जन्मदिवस नोव्हेंबर महिन्यातीलच. पंडित नेहरू, सर वेंकट रमण आणि पु. ल. देशपांडे यांना त्यांच्या जन्मदिनानिमित्त विनम्र आदरांजली आणि बालदिनानिमित्त समस्त बालकांना शुभेच्छा !

नोव्हेंबर २०२३ चा अंक आपल्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे. या अंकामध्ये शालेय कामकाजाचे नियोजन, इंग्रजी अध्यापनातील प्रयोग, शाळेत आणि परिसरात होणारे विविध प्रकारचे प्रदूषण कमी करणे, पर्यावरणस्नेही दिवाळी, एक पाऊल प्लॅस्टिक मुक्ततेकडे, रद्दीतून बुद्धीला चालना अशा विविध विषयांवरील लेखांचा समावेश करण्यात आला आहे. हे सर्व विषय शालेय विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीबरोबरच इतरही चांगल्या सवयी लावण्यासाठी उपयुक्त आहेत.

याच महिन्यात येणाऱ्या 'दिवाळी' या सणानिमित्त आपणांस हार्दिक शुभेच्छा !

**संपादक**

जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,

महाराष्ट्र, पुणे.

# शालेय दिनदर्शिका


**शिवाजी खोपडे**
शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती भोर. भ्रमणध्वनी : ९६२३७३००८०

*शालेय उपक्रम, शालेय सुट्ट्या, दिनविशेष, महत्त्वाच्या नोंदी, शैक्षणिक अभिलेखे आणि त्यांची पूर्तता इत्यादी शाळेसाठी उपयुक्त असणाऱ्या सर्व माहितीचे महिनावार नियोजन करून, शाळेने हस्तलिखित दिनदर्शिका तयार केली. त्यानुसार कामकाज केले, उपक्रम राबविले, त्यामुळे शालेय कामकाजात सुधारणा झाली. शाळेला अनेक पुरस्कार मिळाले. हे सर्व टप्पे उलगडणारा माहितीपूर्ण लेख.*

आपले आर्थिक व्यवहार, दैनंदिन कामे, सण–समारंभ, मासिक नियोजन, जयंती–पुण्यतिथी, प्रवास, तिथी, दिनविशेष इत्यादी विविध बाबी विचारात घेता, सर्व व्यवहार सुरळीतपणे चालण्यासाठी व कालखंड मापनासाठी आपण सर्व जण दिनदर्शिका वापरत असतो.

दुकानांमध्ये कालनिर्णय, महालक्ष्मी, विविध पतसंस्था, बँकांच्या दिनदर्शिका उपलब्ध असतात. इंग्रजी महिन्यांच्या नियोजनानुसार प्रकाशित होणाऱ्या या दिनदर्शिका खूपच आकर्षक, रंगीत, मनमोहक व मनोवेधक असतात.

शाळा स्तरावर शालेय कामकाजाच्या नियोजनाचा सखोल अभ्यास करून शालेय कामकाज व्यवस्थित, नियोजनबद्ध रीतीने चालवण्यासाठी शालेय दिनदर्शिका तयार करण्याची संकल्पना समोर आली. गेली अनेक वर्षे या शालेय दिनदर्शिकेच्या मदतीने शाळा स्तरावर उत्कृष्ट नियोजनातून खूप फायदे अनुभवता आले. शालेय कामकाज ताणविरहित, अचूक, वेळेत होणारा पथदर्शी मार्ग म्हणजे शालेय दिनदर्शिका.




दरवर्षी मे महिन्यामध्ये मागील काही वर्षांची 'मुख्याध्यापक मासिक मीटिंग डायरी' चाळली असता, तसेच पूर्वानुभव लक्षात घेता, पुढील शैक्षणिक वर्षांमध्ये माहेवार कोणकोणती कामे नियमितपणे आपल्याला करावयाची आहेत? कोणकोणते अभिलेख माहेवार पूर्ण करावयाचे आहेत? माहेवार दप्तराविना शाळांतर्गत विविध शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन, अहवालांची वेळेत पूर्तता व्हावी यासाठीचे नियोजन, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी करावयाचे प्रयत्न, या सर्व बाबींचा सर्वप्रथम बारकाईने अभ्यास केल्यानंतर कच्चे नियोजन कागदावर उतरवून घेतले. सर्वसाधारणपणे माहे जूनमध्ये शंभर टक्के पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप, इयत्ता सातवीचे शाळा सोडल्याचे दाखले, नवीन विद्यार्थी नोंद, नवीन दाखला मागणी, विविध लाभांच्या योजना, सरल व यु–डायसची कामे, प्राप्त दाखले नोंदी, शालेय पोषण आहारासंबंधीची कामे, एसएमसी माता– पालक सभा व इतिवृत्ते, विद्यार्थी ऑनलाईन नोंदणी इत्यादी शैक्षणिक कामे करावयाची आहेत. तसेच माहे जूनमध्येच शाळा प्रवेशोत्सव, शाळापूर्व तयारी मेळावे, नवागतांचे स्वागत, उपक्रम

कुंभ, ज्ञान-आरोग्य गुढी, गार्ड ऑफ ऑनर, शालेय मंत्रिमंडळ निवडणूक, वृक्षारोपण, परसबाग पूर्वतयारी, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, अध्यापन इत्यादी उपक्रमांचे व्यवस्थित नियोजन माहे जूनच्या दिनदर्शिकेत करण्यात आले आहे. याशिवाय शैक्षणिक सुट्ट्या, दिनविशेष, वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम, त्या-त्या महिन्यात करावयाची शैक्षणिक कामे इत्यादींचे पूर्ण वर्षभराचे नियोजन तयार करण्यात आले. हे सर्व नियोजन शालेय दिनदर्शिकेच्या प्रत्येक पानावर व्यवस्थितरीत्या बसविल्याने शाळेचे संपूर्ण वर्षभराचे शैक्षणिक व्हिजन तयार झाले. त्यानंतर शाळेच्या वर्षभराच्या व्हिजननुसार कामकाजास सुरुवात केली.

शाळेचे व्हिजन तयार झाल्यानंतर प्रत्यक्ष हाताने तयार केली जाणारी शालेय दिनदर्शिका तयार करण्याचे काम सुरू झाले. सर्वप्रथम A3 आकाराच्या एका झेरॉक्स कागदावर दिनदर्शिकेच्या एका महिन्याच्या पानाचा आराखडा तयार करून घेतला. यामध्ये या महिन्यातील वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचे फोटो, या महिन्यातील शैक्षणिक उपक्रमांच्या कामकाज नोंदी, दिनविशेष, सुट्ट्या, तिथी, सुविचार, नोंदी कॉलम इत्यादींना प्राधान्य दिले. स्केच पेन, रंग यांचा वापर करून प्रत्येक पान आकर्षक करण्याचा प्रयत्न केला. त्यावर दिनांकासह सुवाच्य अक्षरात माहिती लिहिली. सर्व महिन्यांची शाळेच्या व्हिजननुसार सर्व माहिती प्रत्येक पानावर व्यवस्थित बसविण्यात आली आणि अशी तयार झाली, आमची आकर्षक, स्वनिर्मित शालेय दिनदर्शिका! त्याच्या झेरॉक्स प्रती काढून शाळेच्या कार्यालयात व प्रत्येक वर्गात लावण्यात आल्या.

शाळेच्या पहिल्या दिवशी शालेय दिनदर्शिकेचे प्रकाशन शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते केले. त्यानंतर शालेय दिनदर्शिकेनुसार अंमलबजावणीस सुरुवात झाली. दिनदर्शिकेचे एक एक पान माहेवार उलटताना मिळणारा आनंद अवर्णनीय असाच होता. चाकोरीबद्ध उत्कृष्ट नियोजनातून साकारले गेलेले ते आमचे एक स्वप्नच होते. गेली अनेक वर्षे आम्ही शाळा स्तरावर शालेय दिनदर्शिका उपक्रम यशस्वीरीत्या साकारत आहोत.

या शालेय दिनदर्शिकेमुळे शैक्षणिक कामे वेळेत अचूकरीत्या होण्यास मदत झाली. मुख्याध्यापक पदाचा कोणताही ताण न राहता, ताणविरहित कामे पूर्ण झाली. शैक्षणिक अभिलेखे वेळेत पूर्ण झाल्याने अहवाल विना-विलंब देता आले. नियोजनानुसार दिनदर्शिकेबाबत कार्यवाही झाल्याने मुलांसाठी पूर्वनियोजन करून उपक्रम हाती घेता आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना पुरेपूर वाव देता आला. शाळेकडे पाहण्याचा गाव, पालक, प्रशासन या सगळ्यांचा दृष्टिकोन सकारात्मक होण्यास मदत झाली. एक उपक्रमशील शाळा म्हणून शाळेचा नावलौकिक झाला. शाळेला आयएसओ मानांकन, पुणे जिल्हा 'अध्यक्ष चषक' व भोर तालुका 'सभापती चषक' हे मानाचे पुरस्कार प्राप्त झाले. 'शब्दधन फाउंडेशन' मार्फत 'राज्यस्तरीय उपक्रमशील शाळा' पुरस्कार व 'साने गुरुजी स्वच्छ सुंदर शाळा' पुरस्कार, तसेच इंग्रजी ड्रामा स्पर्धेतील जिल्हास्तरीय पुरस्कार इत्यादी विविध पुरस्कार शाळेला प्राप्त झाले, तसेच शाळेतील शिक्षकांना जिल्हा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


या शालेय दिनदर्शिकेच्या नावीन्यपूर्ण यशस्वी उपक्रमास भोर पंचायत समितीच्या कार्यक्षम गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, पालक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# शालेय व्यवस्थापन समिती काय करू शकते?

**मारोती कदम**
जि. प. प्राथ. शाळा पिंपळगाव, ता. पूर्णा, जि. परभणी. भ्रमणध्वनी : ९०४९०२५३५१

*शाळेच्या विकासासाठी शाळा व्यवस्थापन समिती उपयुक्त ठरू शकते. पालक संपर्क, पालक प्रबोधन, गुणवत्ता विकास अशा सर्वच बाबतीत शाळा व्यवस्थापन समिती शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कशी साहाय्यभूत ठरू शकते, याबाबतचे चिंतन करणारा लेख.*

गेल्या दहा–बारा वर्षांपासून शालेय शिक्षण व क्रीडा विभागामध्ये प्रचंड बदल झाले आहेत. सरकारी शाळा म्हणजे गरिबांची, कष्टकऱ्यांची, कामगार वर्गाची, उपेक्षितांची व वंचितांची शाळा असा सरळ–सरळ समज होता, परंतु आता सर्वच स्तरांतील मुले सरकारी शाळांत येऊ लागल्याने तो समज खोटा ठरला आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून महाराष्ट्रातील जि. प. प्राथमिक व माध्यमिक शाळांचे स्वरूप बदललेले दिसते. जिल्हा परिषदांच्या शाळांनी आता 'कात' टाकली आहे. अनेक शाळा 'डिजिटल' स्वरूपात असून ज्ञान, तंत्रज्ञान, विज्ञान यांची अचूक सांगड घालण्याचे काम आजचे 'गुरुजी' झपाटून करत आहेत. शाळेसाठी, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी, पदरमोड करून शाळांची रंगरंगोटी, शैक्षणिक साहित्य निर्मिती करून, शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणत आहेत. हे सर्व करण्याकरिता खऱ्या अर्थाने मनोबल उंचावण्याच्या महत्त्वपूर्ण कार्यात, आजघडीला कार्यरत असणाऱ्या शालेय व्यवस्थापन समिती (एसएमसी) यांची भूमिका दखल घेण्याजोगी आहे. शालेय व्यवस्थापन समितीच्या सनियंत्रणाखाली शालेय व्यवस्थापन सुरळीत चालू आहे. १०० टक्के उपस्थितीकरिता, १०० टक्के पटनोंदणी या स्थानिक पातळीवरच्या जटिल समस्या सोडविणे आणि गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम राबविणे याकरिता एसएमसी हिरिरीने पुढाकार घेते ही विशेष उल्लेखनीय बाब म्हणावी लागेल.



शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून पालक मेळावा, अनुपस्थित पालकांच्या गृहभेटी, शासनाच्या विविध योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, सहली, शिबिरे, परिसर भेट, स्थानिक कारागिरांच्या व्यवसायांना भेटी, वार्षिक स्नेहसंमेलन इत्यादी उपक्रमांचे आयोजन व नियोजन या सर्व कार्यांत शालेय व्यवस्थापन समितीची भूमिका ही अतिशय महत्त्वपूर्ण आहे. याबरोबरच गावातील भजनी मंडळ, ढोल–लेझीम पथक, क्रीडापटू यांच्याकडून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळविण्यासाठी प्रयत्न करणे, गावातील व परिसरातील शिक्षित व्यक्तींना शाळेच्या आवश्यकतेनुसार अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करणे, हेसुद्धा एसएमसी कमिटीच्या माध्यमातून घडू शकते. परिसर भेटीचे नियोजन करण्यासाठी परिसरातील शेती, गोपालन प्रकल्प, कारखाने, बाग, मंडई, रेल्वेस्टेशन, पोस्ट ऑफिस, बँक, शासकीय कार्यालये इत्यादींना भेटी देण्याकरिता शाळेस मदत करणे, याबरोबरच पालकांच्या क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलन आयोजित करून

**(पृष्ठ क्र. १० वर)**

# जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण - काळाची गरज

**पल्लवी शिरोडे**
जि. प. प्राथ. शाळा कोंढवे-धावडे, ता. हवेली, जि. पुणे. भ्रमणध्वनी : ९७६६३१५८८३

*जग जवळ येत आहे. संपर्क माध्यमांमुळे आपण जगात कुठेही सहज संपर्क साधू शकतो, माहिती मिळवू शकतो. जागतिक स्तरावर स्थलांतर मोठ्या प्रमाणात होताना दिसते. अशा काळात जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण महत्त्वाचे आहे, म्हणून त्याचा राष्ट्रीय शिक्षण आराखड्यात समावेश केला आहे. त्यानुसार २०२२ मध्ये भोपाळला प्रशिक्षण पार पडले. या सर्वांची माहिती देणारा लेख.*

हल्ली जगात घडणाऱ्या घटनांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम आपल्या दैनंदिन जीवनावर घडून येत आहेत. वाढलेली उष्णता, अनैसर्गिक पर्जन्यमान, वातावरणातील प्रदूषणाची पातळी वाढणे अशा अनेक परिणामांना आपण सर्व जण सामोरे जात आहोत. पर्यावरण बदल ही भविष्यातील समस्या नसून, ते आताचे वास्तव आहे. दरवर्षी तापमानाचा उच्चांक नोंदवला जात आहे. पर्यावरण बदलामुळे तापमान वाढ तर होत आहेच, शिवाय वातावरण बदलत आहे. तापमान वाढ मानवनिर्मित असून, त्याचा सर्व जगावर, जगातील प्रत्येक गोष्टीवर परिणाम होत आहे.

ही समस्या आता एखाद्या प्रदेशापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर जागतिक झालेली आहे, त्यामुळे ती रोखण्यासाठी जगाने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच कोरोनासारखी महामारी चीनमध्ये सुरू होऊन संपूर्ण जगात पसरली व गेली दोन वर्षे संपूर्ण जग कोरोना महामारीला तोंड देत होते. एकूणच काय जगातील बदलांचे परिणाम स्थानिक पातळीवर दिसून येत आहेत व स्थानिक पातळीवरील कृती/घटनांवर जागतिक बदल अवलंबून आहेत.

Think Global, act Local या उक्तीचा विचार करता, विद्यार्थ्यांना जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. जागतिक नागरिकत्वाच्या शिक्षणात खालील घटकांचा समावेश होतो.

- मानवी हक्कांचे शिक्षण
- शांततेसाठी शिक्षण
- विभिन्न संस्कृतींचा आदर
- लिंग समानता
- सामाजिक न्यायाचे शिक्षण
- सर्वसमावेशक शिक्षण.

एकविसाव्या शतकातील कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवताना, वरील सर्व घटकांचा समावेश शिक्षणात करून, शाश्वत विकास मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविणे गरजेचे ठरले आहे. सध्या जागतिक पातळीवर देशादेशांमधील युद्ध, तणावजन्य परिस्थिती, मानवी हक्कांवरील गदा पाहता जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण ही काळाची गरज आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० मध्ये जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण (Global Citizenship Education For 21st Century Skills.) हा विषय अंतर्भूत करण्यात आलेला आहे. अभ्यासक्रम व अध्यापन पद्धती यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence), समस्या निराकरण (Problem solving), समस्या निराकरणाची कार्यपद्धती (Design thinking) यांच्या

समावेशाबरोबर विद्यार्थ्यांना विविध पातळीवर विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, असे राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये ४.२४, पृष्ठ क्र. १६ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

जग अधिक जवळ आले आहे व जगातील देशांमध्ये परस्पर आंतरक्रिया वाढत आहेत. देश एकमेकांशी अधिकाधिक जोडले जात असताना, सद्यःस्थितीतील जागतिक आव्हानांना प्रतिसाद देणारे शिक्षण देणे आवश्यक आहे, तसेच विद्यार्थ्यांना जागतिक समस्यांबद्दल जागरूक करण्यासाठी व समस्या समजून घेण्यासाठी, अधिक शांततापूर्ण, सहिष्णुतेचे सक्रिय प्रवर्तक बनण्यासाठी व सक्षम करण्यासाठीचे शिक्षण प्रदान केले जाईल. यातूनच सर्वसमावेशक, टिकाऊ शांततापूर्ण व सुरक्षित समाजाची निर्मिती होऊ शकेल. (NEP २०२०, ११.८, पृष्ठ क्र. ३८)

वरील राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने आणि (Asia Pacific Centre of Education for International Understanding - APCEIU) द्वारे २०१७ मध्ये Seoul, South Korea मध्ये झालेल्या सतराव्या APTW मध्ये मिळवलेले शिक्षण लागू करण्यासाठी, १४ ते १८ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत Regional Institute of Education (RIE) भोपाळ येथे जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण आणि एकविसाव्या शतकातील कौशल्ये यांवर आधारित महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांतील शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक यांची प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सरकारी व सरकारी अनुदानित शाळांमधील सहभागींच्या गरजा व अपेक्षांचे मूल्यांकन करण्यासाठी प्रशिक्षणपूर्व सर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेमध्ये सहभागींना स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक समस्यांचे ज्ञान आणि समज तसेच विविध देश आणि लोकसंख्या यांचे परस्पर संबंध आणि परस्परावलंबन कसे आहे, हे विविध कृती, चर्चा यांद्वारे, Group



learning, Peer learning, प्रत्यक्ष ॲक्टिव्हिटीद्वारे समजावून दिले. चिकित्सक विचार, नवनिर्माण क्षमता, सहकार्य, संवाद या अध्ययन कौशल्यांचा अंतर्भाव करून कार्यशाळेत जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण आणि शाश्वत विकास मूल्ये यांचे महत्त्व विशद करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शिकवत असताना; मग तो कुठलाही विषय असो; जसे – भाषा, गणित, विज्ञान किंवा समाजशास्त्र यांपैकी कोणत्याही विषयातून स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक समस्यांचे ज्ञान आणि समज आपण विद्यार्थ्यांना देऊ शकतो.

विविध देश आणि लोकसंख्या यांचे परस्पर संबंध आणि परस्परावलंबन कसे आहे, हे विविध कृती आणि चर्चेद्वारे समजावून देऊ शकतो. ग्लोबल वॉर्मिंग, वातावरणीय बदल, आपत्ती व्यवस्थापन, महापूर, शाश्वत विकास, प्रदूषण या सर्व बाबी स्थानिक कृतींवर कशा अवलंबून आहेत याचा परिचय विविध उपक्रम, कृती घेऊन विद्यार्थ्यांना करून देणे काळाची गरज आहे.

विविध परिवर्तनात्मक अध्यापन पद्धती : जसे – चर्चा, संवाद, गटकार्य, peer learning यांसारख्या अध्यापन पद्धतींचा समावेश केल्यास, सर्जनशील, आनंदी अध्ययनाचा अनुभव विद्यार्थी घेऊ शकतात. यातूनच मानवी हक्क, शांतता, विभिन्न संस्कृतींचा आदर, डिजिटल नागरिकत्व, सामाजिक न्याय, लैंगिक समानता हे घटक आपोआप अध्ययनातून रुजवणे शक्य होईल.

चर्चा, वादविवाद यांतून चिकित्सक विचार करणे. एखाद्या प्रश्नाच्या दोन्ही बाजूंचा विचार करून योग्य निर्णय घेणे, गटकार्यातून सांघिक कार्याचे महत्त्व समजू शकणे इत्यादी क्षमता वादविवाद, चर्चा यांतून विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत करता येतील. विविध कृतींमधील सहभागामुळे एक मजबूत स्नेहबंध निर्माण होऊन, विचारांची समृद्ध देवाणघेवाण होऊ शकेल.

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये जागतिक नागरिकत्वाच्या शिक्षणाबरोबरच सामाजिक आणि भावनिक शिक्षणावर (Social and emotional learning) भर देण्यात आलेला आहे. केवळ विद्यार्थ्यांचे बौद्धिक मूल्यमापन न करता विविध कृती, चर्चा, गटकार्य यांद्वारे विद्यार्थ्यांचे सामाजिक व भावनिक मूल्यमापन करणेही अपेक्षित आहे.

काळाची गरज पाहता, एक शिक्षक म्हणून मी अध्यापनात खालील नवपद्धतींचा/अध्ययन घटकांचा समावेश करू शकतो. (१) स्थानिक व जागतिक घडामोडींचा अभ्यास, परस्पर संबंध स्पष्ट करणे. (२) लैंगिक समानतेवर आधारित शिक्षण देणे. (३) बहुभाषक विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न करणे. (४) जागतिक दर्जाच्या स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी तयार करणे. (५) पाठ्यपुस्तकाबाहेरील आधुनिक ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे.

खरोखरच, भविष्यवेधी शिक्षणाची कास धरून, मुलांना अधिक गतीने शिकण्यास प्रवृत्त करून, यशाच्या मार्गावर नेता येईल, तसेच तंत्रज्ञानाशी मैत्री करून स्पर्धेच्या या युगात आपल्या विद्यार्थ्यांना समर्थपणे पाय रोवण्यास प्रवृत्त करता येईल.

जागतिक नागरिकत्वाचे शिक्षण मुलांना स्वतः शिकण्यास प्रेरित करून जीवनातील प्रत्येक आव्हान पेलण्यासाठी नक्कीच सक्षम बनवेल यात तिळमात्र शंका नाही.

□□□

**(पृष्ठ क्र. ७ वरून)**

उत्साह वाढविणे, माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेऊन शालेय विकासात त्यांचेही योगदान महत्त्वाचे आहे, हे ग्रामस्थांना पटवून देऊन लोकवाटा, लोकसहभागातून 'फंडिंग' उभारून शाळेत जनरेटर, इन्व्हर्टर, प्रिंटर, संगणक प्रोजेक्टर इत्यादी अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून 'लोकल' विद्यार्थ्यांना 'ग्लोबल' करण्याची जबाबदारी एसएमसी ची आहे.

शालेय व्यवस्थापन समितीच्या मासिक सभेत मुलांच्या प्रगतीची माहिती घेणे, केवळ लेखी परीक्षांच्या गुणांची चर्चा न करता खेळ, उपक्रम, प्रकल्प विविध स्पर्धा आदींचे आयोजन करण्यास मदत करणे. याबरोबरच विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन, सभाधीटपणा, संवादकौशल्य इत्यादींची तपासणी, संख्याज्ञानाची तपासणी व पडताळणी, बेरीज, वजाबाकी, भागाकार व गुणाकार आदी मूलभूत क्रिया विद्यार्थ्यांना येतात का? यांची खातरजमा समितीने करावी.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीची केलेली नोंद व विद्यार्थ्यांची प्रगती यांचीही चाचपणी करावी. शाळा हे 'संस्कारपीठ' आहे, याची जाणीव ठेवून शाळेच्या संदर्भात 'राजकारण' न करता समाजहित लक्षात घेऊन, प्रत्येक विद्यार्थी १०० टक्के प्रगत कसा होईल. त्यासाठी कोणकोणते प्रयोग, उपक्रम राबवले पाहिजेत याची मासिक बैठकीत तपशीलवार चर्चा होऊन देशाच्या भावी आधारस्तंभांची पायाभरणी अधिक मजबूत कशी होईल यासाठी शिक्षक, पालक, विद्यार्थी, प्रशासन, शासन यांच्या समन्वयातून शालेय व्यवस्थापन समितीने आपली भूमिका निश्चित करून त्या दिशेने प्रयत्न केले, तर निश्चितच प्रत्येक जिल्हा परिषद (सरकारी) शाळेचे बाह्यरंग व अंतरंग अधिक खुलून येईल व मॉडेल स्कूल म्हणून आपल्या शाळा इतरांना 'प्रेरणा' देतील अशी अपेक्षा बाळगायला काही हरकत नाही.

□□□

# माझा वाढदिवस पुस्तकासोबत

**सुप्रिया ताकभाते**
जि. प. प्राथ. शाळा, विठ्ठलवाडी, जि. सोलापूर.

*विद्यार्थ्यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शाळेला पुस्तक देणे अशा प्रकारचा उपक्रम अनेक शाळा राबवत असतात. यामुळे शाळेचे वाचनालय समृद्ध होते, मुलांचे वाचन वाढते. अशा प्रकारचा उपक्रम विठ्ठलवाडीच्या जि. प. शाळेतही राबविला. वाढदिवसाला मुलांना व शिक्षकांना चॉकलेट वाटप करण्याऐवजी शाळेला पुस्तक देणे या उपक्रमाची उपयुक्तता व यशस्विता याची मांडणी करणारा लेख.*

स्वतःचा वाढदिवस प्रत्येकासाठी खूपच खास असतो. स्वतःचा वाढदिवस हा लहान मुलांचा वर्षातील सर्वांत आवडता दिवस असतो. ज्या दिवशी वाढदिवस असतो, त्यादिवशी इतर सर्व शाळेतील मित्रमैत्रिणी गणवेशात असताना, आपण एकट्याने नवीन ड्रेस घालून जाणे हे त्यांना खूपच विशेष वाटते. वाढदिवसाला सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांना चॉकलेट देणे हे तर त्यांना फारच भारी वाटते. आमच्या शाळेतही विद्यार्थी त्यांच्या वाढदिवसाला शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट देत असत.

एकदा असे लक्षात आले, की वाढदिवस असेल त्या दिवशी वर्गात आणि शाळेच्या परिसरात सर्वत्र चॉकलेटचे प्लॅस्टिक रॅपर दिसतात. शाळेचा पट २०० आहे, त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना एका वर्षात फक्त शाळेत २०० चॉकलेट्स खायला मिळणार (घरी खातात ते वेगळेच). एवढी चॉकलेट्स खाऊन दातांची काय अवस्था होईल, याचा विचार माझ्या मनात आला. यासाठी काहीतरी पर्याय शोधायला हवा, ज्यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम होणार नाही आणि पर्यावरणाची हानी रोखता येईल. मात्र हे करताना, त्यांचा वाढदिवस खासच व्हायला हवा हे पाहिले पाहिजे.



सध्याच्या काळात मोबाईल आणि टीव्हीच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांची वाचनाची सवय खूपच कमी झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे, त्यामुळे वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यातूनच वाढदिवस आणि वाचन यांची सांगड घालून 'माझा वाढदिवस पुस्तकासोबत' हा उपक्रम सुरू केला.

मुले वाढदिवसाला चॉकलेटऐवजी पुस्तक भेट देऊ लागली.

## उद्दिष्टे :

- विद्यार्थ्यांच्या दातांचे आरोग्य राखणे.
- वाचनाची आवड आणि गोडी निर्माण करणे.
- चॉकलेटच्या प्लॅस्टिक रॅपरमुळे होणारी पर्यावरणाची हानी कमी करणे. पर्यावरणविषयक जागृती निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये दातृत्वाची भावना निर्माण करणे.
- शालेय वाचनालय समृद्ध करणे.
- आरोग्याच्या चांगल्या सवयी व शिस्त लावणे.

## नियोजन :

विद्यार्थ्यांना चॉकलेटऐवजी पुस्तक द्यायला

प्रवृत्त करण्यासाठी परिपाठाच्यावेळी सर्वांना एकत्रित मार्गदर्शन केले.

**मार्गदर्शनाचे मुद्दे :**

**(अ) वाढदिवसाला चॉकलेट देण्याचे तोटे**

- चॉकलेट खाऊन दात किडतात. चॉकलेट हा पौष्टिक पदार्थ नाही, त्याचा आपल्या शरीरासाठी फारसा फायदा होत नाही.
- चॉकलेटचे रॅपर प्लॅस्टिकचे असल्यामुळे ते पर्यावरणास हानिकारक आहे. तुमच्या वाढदिवसाला चॉकलेट वाटल्यामुळे पर्यावरणास नकळत हानी पोहोचवली जाते.

वाढदिवसाला चॉकलेट दिल्यामुळे तोटे होत असतील, तर तुमचा वाढदिवस खास असेल का? दुसऱ्यांना आनंद देणारा असेल का? हे प्रश्न विचारार्थ त्यांच्यापुढे मांडले.

**(आ) चॉकलेटऐवजी पुस्तक देण्याचे फायदे**

शाळेसाठी पुस्तक दिल्यामुळे तुमचा वाढदिवस पुस्तकांच्या रूपाने शाळेच्या आठवणीत कायम राहील. तुम्ही दिलेली पुस्तके तुमच्यासोबत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वाचता येतील. हे पुस्तक साधारण दहा वर्षे चांगल्या स्थितीत सहज राहू शकते, त्यामुळे तुम्ही या शाळेतून गेल्यानंतरही इतर विद्यार्थी ती पुस्तके वाचतील. वाचताना त्यावरील तुमचे नाव आणि दिनांक पाहून तुमचा वाढदिवस त्यांना आठवेल. पुस्तकांमुळे पर्यावरणाची कोणतीही हानी होणार नाही.

**(इ) वाचनाचे फायदे**

- वाचनामुळे शब्दसंग्रह वाढतो, ज्ञानात भर पडते.
- वाचनामुळे एकाग्रता वाढते.
- स्मरणशक्ती सुधारण्यास मदत होते.
- संवाद-कौशल्य सुधारते.
- ज्ञान मिळते, वाढते आणि प्रेरणा मिळते.
- वाचनामुळे नवनवीन कल्पना सुचण्यास मदत होते.

**(ई) दातृत्वाची भावना**

आपण दिलेल्या पुस्तकामुळे कितीतरी विद्यार्थ्यांना फायदा होतो हे लक्षात येऊन, तुमच्या मनामध्ये इतरांना काहीतरी देण्याची भावना निर्माण होते.

वरील मुद्द्यांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना परिपाठाच्यावेळी वारंवार मार्गदर्शन केले आणि वाढदिवसाला दिले जाणारे चॉकलेट बंद होऊन आनंदाने पुस्तक हाती पडले.

**प्रत्यक्ष अंमलबजावणी :**

- परिपाठ झाल्यानंतर सर्व विद्यार्थी वाढदिवस असणाऱ्या विद्यार्थ्याला शुभेच्छा देतात.
- वाढदिवस असणारा विद्यार्थी त्याने आणलेले पुस्तक मुख्याध्यापक किंवा शिक्षकांकडे सुपूर्त करतो.
- वाढदिवसाला दिलेल्या पुस्तकावर विद्यार्थ्याचे पूर्ण नाव तारखेसह टाकले जाते.
- पुस्तक देताना सर्वांसमोर फोटो काढला जातो. तो फोटो पालकांच्या आणि शाळेच्या ग्रुपवर टाकला जातो, त्यामुळे इतर पालकांनाही प्रेरणा मिळते.
- 'माझा वाढदिवस पुस्तकासोबत' या उपक्रमात सहभाग नोंदवून, वाढदिवसाला पुस्तक भेट दिले, म्हणून सर्व विद्यार्थी त्याचे टाळ्या वाजवून अभिनंदन करतात.
- विद्यार्थ्यांनी दिलेल्या पुस्तकांची नोंद ठेवली जाते. नोंदीसाठी वाचनालयात स्वतंत्र रजिस्टर केलेले आहे. त्यामध्ये अनुक्रमांक, विद्यार्थ्याचे नाव, इयत्ता, दिनांक, पुस्तकाचे नाव, पुस्तकांची संख्या, किंमत यांची नोंद केली जाते.

**(पृष्ठ क्र. १४ वर)**

# ‘प्रेरणा दिन’ उपक्रमाने संचारले नवचैतन्य

**राहुल कळंबे**

जि. प. प्राथ. शाळा कोटगाव, पं. स. नागभीड, जि. चंद्रपूर. भ्रमणध्वनी : ९२८४२३५३०९

*विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन मोठी स्वप्ने बघण्याचे धाडस त्यांच्यामध्ये निर्माण करावे, या उदात्त हेतूने प्रेरित होऊन जि. प. मधील उच्चपदस्थ अधिकारी वर्गाने पुढाकार घेऊन, प्रेरणा दिनाची संकल्पना समोर आणली. हा उपक्रम संपूर्ण राज्यात राबवला जात आहे. यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आणि वाचनाची गोडी लागण्यास मदत झाली. त्या उपक्रमाची यशोगाथा.*

कौतुकाचे चार शब्द, दिलेली शाबासकी, प्रेरणा यांमुळे कार्य करण्याचा उत्साह वाढतो. लहान वयात तर या प्रेरणेची फार गरज असते, म्हणूनच शालेय विद्यार्थ्यांना प्रेरित करून त्यांच्यामध्ये स्वप्न बघण्याचे धाडस निर्माण करण्याचे कार्य ‘प्रेरणा दिन’ या उपक्रमातून केलेले आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्याचे नियोजन करून, अंमलबजावणी करण्यात आली.

प्रेरणा हा शब्द ऐकूनच आनंद होतो. मनुष्य-जीवनात जी काही स्वप्ने बघतो, जे काही बनतो, त्यामागे त्याला कोणाकडून तरी मिळालेली प्रेरणा असते.

स्वप्न बघण्यास व ते पूर्ण करण्यास कार्यप्रवृत्त होण्यासाठी ‘प्रेरणा दिन’ हितकारक ठरत आहे. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी शाळेत एखादे उच्च अधिकारी नियोजनाप्रमाणे भेट देण्यास येतात. ते विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्याशी हितगुज करतात. विद्यार्थ्यांसमोर आपण अधिकारी कसे बनलो, शिक्षण घेत असताना जीवनात कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले ते प्रसंगानुरूप विशद करतात. विद्यार्थीदेखील त्यांना प्रश्न विचारून, त्यांच्यापुढे आपल्या समस्या मांडतात. या चर्चेमधून विद्यार्थ्यांमध्ये आशावाद निर्माण होतो. मुलांमध्ये आशावाद निर्माण करण्याचे व सुसंस्कारी पिढी घडविण्याचे एकमेव केंद्र म्हणजे शाळा होय. शाळेमधून विद्यार्थ्यांना स्वप्न बघायला प्रोत्साहित करण्याचे काम प्रेरणा दिनातून साध्य होते. भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामदेखील हेच सांगतात.

अधिकारी महिनाभर कार्यालयात व्यस्त असतात, पण चिमुकल्या विद्यार्थ्यांकरिता एक दिवस काढून त्यांच्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यास ते नक्कीच साहाय्य करतात. जिल्हाधिकारी सरांनी आपल्या आई-वडिलांना चक्क शाळेत नेऊन ग्रामीण विद्यार्थ्यांसोबत आपले अनुभव सांगण्याची संधी दिली. उच्चपदस्थ अधिकारीवर्गाचा, शिक्षणाप्रति असलेला दृष्टिकोन शिक्षणपद्धतीला नव्याने चालना देण्यास उत्तेजित करणारा आहे.

आम्हीदेखील जिल्हा परिषद शाळेमधून शिक्षण घेतले व आज तुमच्यासमोर अधिकारी बनून उभे आहोत. आम्हांलादेखील तुमच्या शिक्षकांसारखे गुरुजन होते, हे सांगत जि. प. शाळा कशा दर्जेदार आहेत, शिक्षणाप्रति धडपडत आहेत हाच विश्वास यातून विद्यार्थी, पालक यांच्यात निर्माण होणार आहे. अधिकारीवर्गदेखील शाळेपर्यंत पोहोचून सकारात्मक बदल घडविण्यास काम करत आहे. हे चित्र जिल्ह्यात निर्माण होऊन शिक्षकांची

जबाबदारी वाढलेली आहे. शिक्षक, विद्यार्थी यांना नव्या उमेदीने मार्गक्रमण करण्यास, कार्यतत्पर होण्यास 'प्रेरणा दिन' नक्कीच नव्या युगाचे रणशिंग फुंकणारा ठरणार.

'प्रेरणा दिन' जिल्ह्यात उत्स्फूर्तपणे सुरू असून भविष्यात जि. प. शाळेतील विद्यार्थी मोठे अधिकारी घडण्यास हा उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरणार आहे.

*'नवयुगाचा सूर्य उगवला नव्या क्षितिजावरती,*

*प्रेरणा दिन सुरू जाहला अवघ्या महाराष्ट्रामधी'*

(पृष्ठ क्र. १२ वरून)

- फक्त नोंद करतानाच पुस्तकाची किंमत लिहिली जाते. सर्व विद्यार्थ्यांसमोर पुस्तकाच्या किमतीचा उल्लेखही होणार नाही, याची काळजी घेतली जाते.
- शाळेतील दर्शनी फलकावर पुस्तक देणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव त्यादिवशी लिहिले जाते.

अशा प्रकारे 'माझा वाढदिवस पुस्तकासोबत' याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाते.

वाढदिवसाला पुस्तक देणे हे ऐच्छिक आहे. त्याचबरोबर पुस्तक किती किमतीचे असावे याचे बंधन नाही. त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या ऐपतीप्रमाणे पुस्तक आणतात.

यात बोधकथा, भाषणे, उजळणी, सामान्य ज्ञान, थोर पुरुषांची आत्मचरित्रे, वैज्ञानिक कथा आणि संत साहित्य अशा अनेक प्रकारच्या पुस्तकांचा समावेश असतो.

**फलनिष्पत्ती :**

- हाती पुस्तक आले आणि मुले वाचू लागली.
- वाढदिवसाला चॉकलेट देणे पूर्ण बंद झाले.
- चॉकलेटच्या रॅपरमुळे होणारा कचरा नसल्यामुळे पर्यावरणाची हानी रोखता आली.
- दातांच्या आरोग्याविषयी जागृती निर्माण झाली.
- विद्यार्थ्यांमध्ये दातृत्वाची भावना निर्माण झाली.
- शाळेतील प्रत्येक विद्यार्थी उपक्रमामध्ये सहभागी झाला.
- शालेय वाचनालय समृद्ध झाले.
- शालेय वाचनालयात २०१९ पासून २०२३ पर्यंत (कोरोना काळाची दोन वर्षे वगळता) १०,००० रु. किमतीची ५०० पुस्तके जमा झाली आहेत.
- विविध विषयांवरील पुस्तके असल्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाचे भांडार उपलब्ध झाले आहे. त्यामुळे वाचनाची गोडी निर्माण होऊन वाचनाची सवय लागली आहे. हा उपक्रम गेली पाच वर्षे चालू आहे.


**वर्गणीदार होण्यासाठी**

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# इंग्रजी अध्यापनातील प्रयोग

**सुनीता इंगळे**
नगरपालिका शाळा क्र. ६, कोपरगाव, जि. अहमदनगर. भ्रमणध्वनी : ९८८१४६८८३८

*प्राथमिक स्तरावर पहिलीपासून इंग्रजी विषय आहे. इंग्रजी विषयाचे अध्यापन प्रभावी व्हावे, यासाठी विविध उपक्रम राबवणे गरजेचे आहे. इंग्रजी भाषेच्या अध्यापनासाठी आपल्या वर्गात, आपल्या शाळेत कोणकोणते उपक्रम राबवता येतील, कोणते प्रयोग करता येतील याबाबतचे मार्गदर्शन करणारा लेख.*

**उद्दिष्टे :**

(अ) रंजक पद्धतीने श्रवण, संभाषण, उच्चारण आणि लेखनकौशल्य विकसित करणे.

(ब) वाचन लेखनास साहाय्यभूत ठरतील अशा विविध खेळांतून, उपक्रमांतून आनंददायी पद्धतीने सराव देणे.

(क) शब्दसंग्रह वाढविणे.

(ड) इंग्रजी वाचनाची तंत्रे विद्यार्थ्यांना माहीत करून देणे.

(इ) शुद्ध व स्पष्ट उच्चारानुसार वाचनाची सवय लावणे

**अंमलबजावणीचे स्वरूप :**

माझी शाळा ही पूर्णतः झोपडपट्टी भागातील, मजुरी करणारे पालक असणाऱ्या मुलांची आहे. पालक दररोज सकाळीच मजुरीच्या निमित्ताने बाहेर जातात व रात्री उशिरा घरी येतात. त्यामुळे आपल्या पाल्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही. सर्व विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी असल्याने मुले मराठीत आत्मविश्वासाने बोलतात; पण तेवढा आत्मविश्वास इंग्रजीत बोलताना आढळून येत नाही. इंग्रजी शिकवत असताना विद्यार्थ्यांच्या काही समस्या आढळून आल्या. मुळातच इंग्रजी विषयाची मनात भीती असल्याने संवादकौशल्य आत्मसात करण्यास मुलांना अडचण येत होती. प्रश्नांची उत्तरे लिहितानाही शब्दांमधून काही अक्षरे गाळून टाकत किंवा चुकीचे स्पेलिंग लिहीत, हे लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांसाठी काही उपक्रम राबविले, तर निश्चितच विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची भीती कमी होऊन विद्यार्थी आत्मविश्वासाने बोलू शकतील, सुस्पष्ट वाचू व लिहू शकतील असे वाटून, काही उपक्रम घेण्याचे निश्चित केले व दुसऱ्या दिवसापासून लगेचच उपक्रमास सुरुवात केली.




सुरुवातीला काही तोंडी सूचनांचा इंग्रजीतून सराव घेऊन त्यावर आधारित कृती घेतल्या. त्यात सर्व घटक अंतर्भूत असणारी एक इंग्रजी शब्दभिंत असावी असे खूप वाटत होते. क्षणाचाही विचार न करता विद्यार्थ्यांशी चर्चा केली व इंग्रजी शब्दभिंत तयार झाली.

इंग्रजी 'शब्दभिंत' हा एक उपक्रम सध्या वर्गात सुरू आहे. यात वर्गाची एक संपूर्ण भिंत इंग्रजी या विषयासाठी तयार केलेली आहे. यावर चित्रे, चित्र व शब्दकार्ड, शब्दयुक्त तक्ते (शरीराचे अवयव, प्राणी, पक्षी, भाज्या, फुले, फळे, वाहने इत्यादी) लावलेले आहेत. या भिंतीवर ५० ते ६० शब्दकार्डे लावलेली

आहेत. वर्गात दररोज या कार्ड वाचनाचा सराव घेतला जातो. या शब्दभिंतीचा उपयोग करून अनेक छोटे–छोटे खेळ, उपक्रम घेतले जातात. जसे –

- कोणतेही एक इंग्रजी अक्षर देऊन त्यापासून सुरू होणारे शब्द शोध.
- कोणतेही एक अक्षर देऊन, त्या अक्षराने शेवट होणारे शब्द शोध.
- मध्ये 'a' येणारे शब्द शोध.
- तीन अक्षरी शब्द शोध.
- दोन अक्षरी, चार अक्षरी, मोठ्यातमोठे शब्द शोध.
- यमक जुळणारे शब्द शोध.
- तुला आवडणारा शब्द शोध.
- दिलेल्या शब्दांचे अर्थ लिही.
- दिलेल्या शब्दांपासून वाक्य तयार कर.
- फुलांची नावे शोध.
- प्राण्यांची नावे शोध.
- भाज्यांची नावे लिही.
- शरीराच्या अवयवांची नावे लिही.
- पक्ष्यांची नावे लिही.
- एकूण कार्डांची संख्या लिही.
- एका मिनिटात जास्तीतजास्त शब्द लिही.
- न चुकता शब्द वाच.

अशा विविध प्रकारे मुलांचा सराव घेतला जातो. यात विद्यार्थी चांगले रममाण होतात.

वर्गातील विद्यार्थ्यांची सर्वांत आवडती जागा म्हणजे 'इंग्रजी शब्दभिंत' आहे. त्याचा उपयोग अध्ययन समृद्धीसाठी चांगला होत आहे. विद्यार्थी गटागटानेही या 'शब्दभिंती'चा उपयोग करत आहेत.

### उपक्रमाची यशस्विता :

सुरुवातीला विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय अध्ययनाला घेतला, तरी नकोसा वाटायचा, पण इंग्रजी विषयाचे काही रंजक खेळ, उपक्रम वर्गात सुरू केले आणि इंग्रजीचा तास हवासा वाटू लागला. इंग्रजी शब्दभिंतीवरील मजकूर वाचन, शब्दवाचन यांत विद्यार्थी सक्रिय सहभाग घेतात, आत्मविश्वासाने वाचन करतात. विद्यार्थ्यांचे वाचन नमुन्यांचे व्हिडिओ करून यू–ट्यूबवर अपलोड केलेले आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांनाही आनंद होत आहे. विद्यार्थ्यांत वाचनाची स्पर्धा निर्माण होत आहे. 'शब्दभिंत' यांसारख्या उपक्रमांमुळे मुले इंग्रजी अध्ययनात रमण्यास मदत झाली. मुले शब्दभिंतीजवळ जाऊन बसतात, शब्द वाचण्याचा प्रयत्न करतात, सोपी वाक्ये वाचून बघतात; हेच या उपक्रमाचे यश आहे. याचा आणखी एक परिणाम म्हणजे विद्यार्थी गोष्ट सांगणे याकडे वळत आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजीशी संबंधित महत्त्वाची माहिती चित्रांसहित टॅबवर उपलब्ध करून दिली जात आहे. इंग्रजी वाचनाकडे न वळणारी मुले आवर्जून इंग्रजी वाचत आहेत. एकूणच या उपक्रमाचा चांगला परिणाम होत आहे.

- या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत आनंददायी वातावरण निर्माण झाले.
- विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाचा शब्दसंग्रह वाढला.
- शुद्ध व स्पष्ट उच्चारानुसार वाचनाची सवय लागली.
- स्पेलिंग लिहिण्यामध्ये सुधारणा झाली.
- रंजक पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, संभाषण, उच्चारण व लेखनकौशल्य विकसित झाले.
- वर्गात हा उपक्रम सुरू असल्याचे विद्यार्थ्यांनी इतर वर्गातील आपल्या मित्रांना सांगितले, त्यामुळे दुसऱ्या वर्गातील मुलेही इंग्रजी वाचनाकडे वळली. 'इंग्रजी शब्दभिंत' व इतर उपक्रम शाळेतील इतर वर्गातही सुरू झाले.
- विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी संभाषण करण्याचा आत्मविश्वास निर्माण होऊ लागला आहे.

# माझा वर्ग माझे उपक्रम

**योगिता सोनवणे**
पिंपरी-चिंचवड मनपा शाळा क्र. ९३, सोनवणे वस्ती, भ्रमणध्वनी : ८३८००६७२७४

*मुलांच्या भावविश्वात खेळण्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. भातुकलीचा खेळ लहान मुलांच्या आवडीचा असतो. वर्ग अध्यापन व मार्गदर्शन अधिक रंजक, आनंददायी करायचे असेल, तर मुलांच्या आवडीचा अंतर्भाव त्यामध्ये केला पाहिजे. हे ओळखून Toy sharing bank हा उपक्रम राबवला; त्याची संकल्पना, आयोजन आणि उपयुक्तता यांची मांडणी करणारा लेख.*

**उपक्रमाचे नाव : Toy sharing bank**

**उद्देश :**

- मुलांना वेगवेगळ्या खेळण्यांचा अनुभव मिळावा.
- आपल्याला मिळालेली खेळणी जबाबदारीने सांभाळता यावी. (आपली वस्तू जपून वापरणे, जपून ठेवणे, तिची काळजी घेणे).
- यातूनच पुढे सार्वजनिक वस्तूंचा वापर जबाबदारीने व काळजीपूर्वक करावा, तसे केले तरच आपल्याला इतर सार्वजनिक सुविधांचा लाभ चांगल्या प्रकारे मिळू शकतो, अशी शिकवण स्वतःच्या कृतीतून अनुभवता यावी.
- आपल्याला आवडणारी खेळणी share करता यावी, प्रसंगी आपल्या आवडीची गोष्ट मिळण्यासाठी वाट पाहण्याची मनाची तयारी व्हावी.
- खेळणे खराब झाले, तुटले, तर किरकोळ दुरुस्ती करता यावी, त्यासाठी मार्ग सुचावा. खेळण्यातून सर्जनशीलतेचा विकास व्हावा.

**स्वरूप :**

वर्गाचा पट ४४ होता. खेळण्यांचे ४४ सेट जमा केले. सर्व खेळणी वर्गात नेली. मुलांसमोर मांडली. मुलांना सांगितले, समोरील खेळण्यांपैकी आवडलेले खेळणे घरी घेऊन जायचे, दोन किंवा तीन दिवस खेळायचे व सांगितलेल्या दिवशी परत आणायचे. त्यादिवशी सर्वांनी आपापली खेळणी परत समोर मांडायची व पुन्हा वेगळे खेळणे निवडायचे. पुन्हा दोन-तीन दिवसांनी जमा करायचे. बदलून नवे घ्यायचे.

**नियम :**

- प्रत्येक वेळी नवीन/वेगळ्या प्रकारचे खेळणे निवडावे.
- खेळणे हरवू नये, हरवल्यास परत दुसरे खेळणे मिळणार नाही.
- नियमित अभ्यास करणाऱ्या, शिस्तीने वागणाऱ्या, इतरांना त्रास न देणाऱ्या मुलांना खेळणी निवडण्याची संधी प्रथम दिली जाते, त्यामुळे आवडीचे खेळणे मिळण्याची खात्री होते.
- तुमच्या आवडीचे खेळणे कदाचित तुम्हांला यावेळी मिळणार नाही, पण नंतर कधीतरी नक्कीच तुम्हांला संधी मिळेल; पण तोपर्यंत मिळालेले खेळणे खेळायचे.

**उपक्रम कसा सुचला :**

**प्रसंग १ :** वरिष्ठ वेतन श्रेणी ऑनलाईन ट्रेनिंग झाले, तेव्हा त्यात वर्गातील Play Area संदर्भात ऐकले, मला ती संकल्पना विशेष आवडली.

**प्रसंग २ :** मुलांच्या भावविश्वातील विषयांवर अधूनमधून बोलायची संधी मुलांना वर्गात देते. (आई, वडील, भावंडे, मित्र, शाळा) असेच एकदा स्वतःच्या खेळण्यांबद्दल बोलायला सांगितले. कोणाकडे एक बॉल, कोणाकडे एक बाहुली, भोवरा, बॅट, भांडीकुंडी अशी एक किंवा फार तर दोन-तीन खेळणी होती. अजून काय खेळायला आवडेल याची लिस्ट मात्र मोठी होती.

**प्रसंग ३ :** एका रविवारी माझ्या मुलांची खेळणी उचलून ठेवत होते. समोर वर्तमानपत्रातील SBI बँक संदर्भात कसलेतरी पॅम्प्लेट होते. खेळणी आणि बँक पॅम्प्लेट दोन्ही डोळ्यांसमोर होते. अचानक त्या क्षणी खेळण्यांची बँक असायला हवी असे वाटले. आजूबाजूची सगळी खेळणी/पसारा तसाच ठेवून, 'टॉय बँक' कशी बरे करता येईल? याचा विचार सुरू झाला आणि यातूनच Toy sharing Bank हा उपक्रम सुरू झाला.



### खेळणी कशी मिळाली?

(१) माझी मुले लहान आहेत, मुलगी पहिलीत आणि मुलगा बालवाडीच्या वयाचा, त्यामुळे माझ्याच घरात खूप खेळणी होती. आत्या, मामी, मावशी व इतर नातेवाईकांनी दिलेली, काही खेळणी आम्ही घेतलेली होती.

(२) आमचे शेजारचे कुटुंब नोकरीनिमित्त जपानला शिफ्ट झाले. त्यांच्या मुलांची एक बास्केट भरून खेळणी ते माझ्या मुलांसाठी देऊन गेले होते.

(३) अजून कमी पडणारी खेळणी माझ्या मैत्रिणीने दिली.

अशा प्रकारे मिळालेली सर्व खेळणी व्यवस्थित वर्गीकरण करून वेगवेगळी केली. मी तुमच्यासाठी खेळणी आणणार आहे, असे आधी सांगून झाले होते. त्या दिवशी माझ्याकडील खेळण्याने भरलेल्या भल्या मोठ्या बॅगा बघून मुले प्रचंड खूश झाली.

### उपक्रम राबवत असताना आलेले अनुभव :

सुरुवातीला वर्गाच्या समोरील बाजूस वेगवेगळ्या बाहुल्या, भांडीकुंडी, मेकअप सेट्स मांडून मुलींना संधी दिली. एकेकीने समोर यायचे आपल्या आवडीचे खेळणे घ्यायचे व जागेवर बसायचे. मुलांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे ब्लॉक्स, गाड्या अशी खेळणी होती. नंतर नंतर मुलांची खेळणी व मुलींची खेळणी असे न करता कोणतेही खेळणे निवडायची संधी मुलांना दिली. (एव्हाना मुलांची व मुलींची खेळणी वेगळी करून, माझी चूक झाली होती हे माझ्या लक्षात आले होते.)

पहिल्याच दिवशी खेळण्याची निवड चालू असताना आमच्या वर्गातील खेळकर, पण थोड्या हट्टी वैशालीला मेकअप सेट हवा होता आणि नेमका तो लक्ष्मीने घेतला. वैशालीचे बिनसले आणि ती रुसून बसली. सगळ्यांची खेळणी घेऊन झाली, पण वैशाली काही जागची उठेना. ''मला तेच पाहिजे, नाहीतर नकोच.'' असा हट्ट धरून बसली. तिला समजावून सांगितले, ''अगं, आता नाही मिळाले, तरी पुढच्या वेळी मिळेल तुला, पण काही केल्या ती ऐकेना. मग शेवटी म्हटलं, ''राहू देत, तू आता नको घेऊ, पुढच्या वेळी घे खेळणे.'' तेवढ्यात लक्ष्मी आली व म्हणाली, ''मॅडम, द्या हा मेकअप सेट तिला, मी पुढच्या वेळी घेईन.'' मेकअप सेट मिळाल्यानंतर वैशालीच्या चेहऱ्यावर हसू आले. लक्ष्मीने जो समजूतदारपणा दाखवला त्यासाठी आम्ही सर्वांनी टाळ्या वाजवून तिचे खूप कौतुक केले. या उपक्रमातील हे एक अनपेक्षित साध्य होते. यानंतरही बऱ्याचदा आपल्या मित्राला आपले खेळणे हवे असल्यास द्यायचे असे बऱ्याच मुलांनी केले. पहिल्यांदा खेळणी दिल्यानंतर तीन दिवसांनी खेळणी परत येतील का? तुटली, हरवली तर नसतील ना? अशा शंकांसोबत उत्सुकताही होती,

पण सगळ्या मुलांनी खेळणी व्यवस्थित खेळून परत आणली. अपवाद वैशालीचा. तिने मेकअप सेटमधील एक–दोन वस्तू हरवल्या होत्या. सर्वांची खेळणी जमा केली, सर्वांनी बदलून घेतली. वैशालीला मेकअप सेट परत देण्याची इच्छा तशी नव्हतीच. पहिलीच वेळ होती, त्यामुळे जरी वस्तू हरवल्या, तरी तिला एक संधी दिली व दुसरे खेळणे दिले. दुसऱ्या दिवशी मात्र हरवलेल्या वस्तू घेऊन ती आली. अशा प्रकारे दर दोन–तीन दिवसांनी आम्ही खेळणी बदलत होतो. गाडीचे चाक निघाले, तर दुसरे तुटलेल्या गाडीचे चाक बसवणे, चिकटपट्टी, फेविकॉलने चिटकवणे असे सुरू होते. एका बाहुलीचे सर्व केस निघाले आणि ती टकली झाली. एका विद्यार्थिनीने गडद निळ्या दोऱ्याचे केस बनवून सुईने शिवून बसवून आणले. मला तेव्हा किती भारी वाटले, काय सांगू! आम्ही सगळ्यांनी तिचे खूप कौतुक केले. मग काय नंतर उरलेल्या बाहुल्यांना पण केस आले. आणखी एका विद्यार्थिनीने तर रंगीबेरंगी केसांची बाहुली केली. बऱ्याच मुलींनी बाहुल्यांना वेगवेगळ्या प्रकारचे कपडे शिवले. एक विद्यार्थिनी तर जणू काही ड्रेस डिझायनर झाल्यासारखी मस्त–मस्त कपडे बनवत होती. मी अधूनमधून वर्गातही मित्रांसोबत खेळणी खेळण्याची संधी त्यांना देत होते. घरी खेळणी खेळत असताना, त्याचे फोटो मुले वर्गाच्या WhatsApp ग्रुपवर टाकायची. ब्लॉक्सपासून वेगवेगळ्या वस्तू बनवायची, त्याचे फोटो पाठवायची. एक दोघांनी ब्लॉकपासून माझे Yogita नाव बनवून पाठवले, तेव्हाही माझ्याबद्दलच्या या प्रेमाबद्दल खूप छान वाटले.

अशा प्रकारे अतिशय सुंदर प्रकारे मार्च ते एप्रिल एक महिनाभर उपक्रम सुरू होता. एप्रिल महिन्यात परीक्षा संपल्यावर काय करावे असा प्रश्न मला पडला. मुले म्हणाली, ''मॅडम खेळणी जमा करून घ्या, सुट्टीवरून आल्यावर खेळू.'' मला वाटले, एक खेळणे सुट्टीत खेळण्यासाठी राहू द्यावे. सुट्टीचा एक ते दीड महिन्यांचा कालावधी. कदाचित खेळणी नाहीच यायची परत, पण राहू द्यावीत मुलांनाच खेळणी. मी त्यांना म्हटले, खेळणी घेऊन जा, जून महिन्यात शाळा सुरू झाल्यावर आणा परत जून महिन्यात मुले शाळेत आली, विशेष म्हणजे सर्व मुलांनी खेळणी परत आणली. मला अगदी मनापासून अतिशय आनंद झाला. आपल्या खेळण्याची काळजी, जबाबदारी त्यांनी महिनाभर घेतली होती आणि पुन्हा नवीन खेळण्यासाठी, बदलून देण्यासाठी माझ्याकडे आग्रह करत होती.

जून महिन्यात शाळा सुरू झाल्यापासून आपापसात खेळणी बदलून मुले खेळत आहेत. आता मात्र ही खेळणी त्यांना देऊन टाकली आहेत, कारण खेळण्यांचा दुसरा उपक्रम सुरू करण्याचा विचार मनात आहे.

अशा प्रकारे अतिशय छान असा अनुभव या उपक्रमातून माझ्या मुलांना आणि मला मिळाला आहे.

**मदतीचे आणखी हात :**

- माझ्या ८ वर्षांच्या भाचीला जेव्हा मी या उपक्रमाबद्दल सांगितले, तेव्हा ती म्हणाली ''आत्तू, तुला हवी असतील, तर माझीही खेळणी घेऊन जा.''
- माझी मुले कधी कधी म्हणतात, ''मम्मी, ही खेळणी तुझ्या मुलांना खेळायला घेऊन जा.''
- आमच्या एका बाईंनी त्यांच्या नातवंडांची एक पोतेभरून खेळणी मला देण्यासाठी ठेवली आहेत.
- माझी लहान बहीणही, लवकरच खेळणी घेऊन येते म्हणाली.
- हा अनुभव वाचून, आणखी बऱ्याच मित्रमैत्रिणी; ज्या नेहमी मदत करतात, त्या घरी खेळणी घेऊन येतील हे नक्की.

उपक्रम आवडल्यास तुमच्या शाळेत नक्की राबवून पाहा.

□□□

# एक पाऊल प्लॅस्टिक मुक्ततेकडे

**विभावरी कांबळे-साळवे**
जि. प. प्राथ. शाळा साळवडे, ता. भोर, जि. पुणे.

*प्लॅस्टिक कचरा ही मोठी समस्या आहे. त्यासाठी प्लॅस्टिकचा वापर टाळणे, शक्यतो शाळेच्या आवारात प्लॅस्टिक वापरावर निर्बंध घालणे, तसेच कचऱ्याची वर्गवारी आणि विल्हेवाट यासंबंधी काळजी घेणे गरजेचे असते. त्यासंबंधी राबवलेल्या उपक्रमांची माहिती देणारा लेख*

आज वेगवेगळ्या प्रकारच्या प्रदूषणाने जगाला वेढले आहे. प्रदूषणाच्या या प्रकारांमध्ये प्लॅस्टिकचे प्रदूषण हे सर्वांत घातक आहे, कारण त्याचे विघटन होत नाही. मानवी आरोग्याबरोबरच निसर्गातील विविध घटकांवरदेखील प्लॅस्टिकचे दुष्परिणाम होत आहेत.

भोर तालुक्यातील माझ्या साळवडे गावाचा निसर्गरम्य परिसर प्रत्येकाला आकर्षित करतो. सन २०२२-२३ मध्ये 'माझी वसुंधरा' या अभियानात सहभाग घेऊन, परिसर अधिकाधिक प्रदूषणमुक्त व सुंदर बनविण्याचा प्रयत्न सुरू केला.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असते. ग्रामपंचायतीने राबवलेल्या वसुंधरा अभियानात जि. प. प्राथमिक शाळेच्या १००% विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

- सर्वप्रथम मुलांना कचरा संकलनाची सवय लावायची होती.
- प्लॅस्टिक कचऱ्याचे योग्य प्रकारे विलगीकरण करणे (ओला कचरा, सुका कचरा वेगळा करणे.)
- विलगीकरण केलेला प्लॅस्टिक कचरा योग्य प्रकारे जमा करून संकलन केंद्रात जमा करणे.
- प्लॅस्टिक कचऱ्याचे दुषरिणाम मुलांना व पालकांना पटवून देणे.

पालकसभा घेऊन विद्यार्थ्यांसह पालकांना या उपक्रमाची सखोल माहिती देऊन मार्गदर्शन केले. या उपक्रमाअंतर्गत खालील गोष्टी मुलांनी करायच्या होत्या.

- आपल्या घरातील प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्यांचे संकलन करणे.
- मुलांना घरी व शाळेतून वाढदिवसानिमित्त मिळणारी चॉकलेट्स, बिस्किट व इतर खाऊच्या रिकाम्या पाकिटांचे संकलन करून ते या बाटल्यांमध्ये भरणे.
- प्लॅस्टिकचे कागद पूर्णपणे कोरडे असतील हे पाहणे.
- बाटलीमध्ये बाहेरचा कचरा, कागद, ओला कचरा येता कामा नये. पालकांनी स्वतःही यात लक्ष द्यावे.
- पालकांनी आपल्या पाल्याने संकलित केलेल्या प्लॅस्टिकचे व्यवस्थित निरीक्षण करावे.
- योग्य प्रकारे विलगीकरण करण्यास पालक व शिक्षकांनी मदत करावी.

अशा सर्व अटी व नियम मुलांना सांगितले. थोड्याच दिवसांत उपक्रमाचे फलित दिसून आले. विद्यार्थी आता शाळेत व घरी प्लॅस्टिक कचरा इतरत्र न फेकता, व्यवस्थित बाटल्यांमध्ये संकलित करू लागली.

### झालेला बदल :


- विद्यार्थी कचऱ्याचे विलगीकरण करू लागले.
- शाळेचा व घराचा परिसर स्वच्छ ठेवू लागले.
- पालकांनाही प्लॅस्टिक इतरत्र न टाकता त्याचे योग्य प्रकारे संकलन करण्याचे मार्गदर्शन मिळाले. मुलांना कचरा इतरत्र न फेकण्याची सवय व शिस्त लागली.

# उपक्रमांच्या दुनियेत

**नीलम सुंबे**
जि. प. प्राथ. शाळा भाळवणी, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

*"Education is the most powerful weapon which you can use to change the world." असे नेल्सन मंडेला यांनी म्हटले आहे. मग हे शिक्षण आपल्या विद्यार्थ्यांना कृतींतून, उपक्रमांतून दिले, तर ते अधिक परिणामकारक होईल. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि सोबत शाश्वततेची जोड यादृष्टीने विचार करून राबविलेल्या उपक्रमाविषयी...*

अध्यापन करताना विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आपण गाणी, गोष्टी, नृत्य, खेळ यांचा उपयोग करतो, तसेच नाट्य, कला, अभिनय यांद्वारेही विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेतो. याच दृष्टीने अध्यापन करताना, मी माझ्या अध्यापनाला विविध उपक्रमांची जोड देत आले आणि तितक्याच उत्स्फूर्तपणे विद्यार्थी सहभागातून यश मिळत गेले. नेहमीप्रमाणे २८ फेब्रुवारी म्हणजेच, 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' या वेळीही असाच काहीतरी नवीन उपक्रम घेऊन येणार याची चाहूल माझ्या विद्यार्थ्यांना लागली. काही विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षपणे त्याबाबत विचारले, की मॅडम आपण 'विज्ञान दिन' कसा साजरा करणार आहोत? हा प्रश्नच माझ्या उपक्रमांचे यश सांगत होता. अगोदरच ठरविल्याप्रमाणे मी









'रांगोळीतून विज्ञान' हे उपक्रमाचे नाव विद्यार्थ्यांसमोर जाहीर केले. नेहमी इतकाच उत्साह, तोच आनंद आणि सहभागी होण्याचा प्रयत्न सर्व वर्गात दिसून आला. विद्यार्थ्यांना दोन दिवस अगोदर, इयत्ता चौथी ते आठवी विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातील विविध आकृत्या दाखवून प्रत्येकाला योग्य त्या आकृत्यांचे विभाजन करून देण्यात आले. पेन्सिल, वही यांच्या रेखाटनातून सर्व विद्यार्थ्यांनी विज्ञान आकृत्या व त्यांची नावे यांचा सरावात्मक अभ्यास केला. रांगोळीतून आकृत्या रेखाटताना त्यातील रंगसंगती योग्य असणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन, अगोदरच विद्यार्थ्यांना रंग कोणते वापरावे याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले आणि दुसऱ्या दिवशी माझ्या शाळेतील या ज्युनिअर शास्त्रज्ञांचे सुप्त गुण रांगोळी-रंग या जोडीने प्रत्यक्ष उतरले. अगदी शाळेत सतत अनुपस्थित राहणारे विद्यार्थीही आज उत्साहाने सहभागी होऊन स्वतःची उपस्थिती व कलागुण दाखविण्यात इतके गुंग झाले, की

तहानभूकही विसरले हेच या उपक्रमाचे यश होते. याप्रसंगी सर्व शिक्षकांनी व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले. कोणी मानवी हृदय, तर कोणी मानवी अस्थिसंस्थेचा सापळा, कोणी वनस्पती पेशींची रचना, तर कोणी जमिनीवर आपली सूर्यमाला रेखाटली. खरेच कौतुक करण्यास शब्द अपुरे पडत होते आणि या कौतुकरूपी शब्दास विद्यार्थी पात्रही ठरले होते.

शिक्षणाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाळवणी शाळेस भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचा उत्साह नवनवीन उपक्रम सुरू करण्यास प्रेरणा देणारा होता; म्हणूनच मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात येणारा 'जागतिक महिला दिन' अशाच एका नवीन उपक्रमातून साजरा करण्याचे मी ठरवले. इयत्ता दुसरी ते सातवीच्या विद्यार्थिनींना उपक्रमाची माहिती दिली. इंटरनेटच्या साहाय्याने उच्चपदस्थ महिला, ऐतिहासिक, साहसी कर्तबगार महिला, यांच्याविषयी माहिती संग्रहित केली. या माहितीचे विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात मुद्देसूद लेखन करून घेतले.



'बेटी नही है किसीसे कम, बेटी से मिलेगा देशको दम' यांसारख्या विविध घोषणा विद्यार्थिनींनी त्यांच्या लिखाणातून मांडून विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविलेल्या स्त्री–शक्तीचा परिचय करून दिला. स्त्री–शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना सोबतच स्त्री–शक्तीची ओळख आपल्या वेशभूषेतून करून दिली. राजमाता जिजाऊ ते आजची क्रिकेटपटू मिताली राज पर्यंत विविध रूपे ८ मार्च रोजी शालेय प्रांगणात अवतरली होती. झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, लता मंगेशकर, प्रतिभाताई पाटील, साक्षी मलिक, पी. व्ही. सिंधू, सिंधुताई सपकाळ यांच्या रूपातील आपल्या विद्यार्थिनी बघताना समाधान वाटत होते, तर मुलींच्या पालकांनाही आपल्या मुलींना या रूपात बघून मनस्वी आनंद होत होता. यातूनच 'मेरी बेटी मेरा अभिमान' याचे चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर सहज उभे राहिले.

अध्यापनाची पद्धत कोणतीही असो, फक्त समोरील विद्यार्थ्यांच्या मनाचा ठाव शिक्षकाला घेता आला पाहिजे. कोणीतरी आपल्याला चांगले म्हणावे, ही मुलांची मानसिक गरज असते. कौतुकाचे दोन शब्द, पाठीवर शाबासकीची थाप खरेच प्रेरक ठरते. शिक्षकांच्या हातांना नवनिर्मितीचे शस्त्र मिळाले, तरच खऱ्या अर्थाने शिक्षण आनंददायी होईल असे वाटते.

# शाळेतील परसबाग घरोघरी

**सचिन दरेकर**

रा.जि. प. शाळा गोळेगणी, ता. पोलादपूर, जि. रायगड. भ्रमणध्वनी : ८९८३९०१५१६

बदली होऊन शाळेत हजर झाल्यानंतर 'गुणवत्ता हीच मालमत्ता' या विचाराने शाळेत 'विद्यार्थी गुणवत्ता वाढ' हेच अंतिम ध्येय ठेवून कामास प्रारंभ केला. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना परिपूर्ण उपयोजित ज्ञान मिळावे या हेतूने शाळेतील सर्व शिक्षकांशी चर्चा करून शाळेत अभ्यासपूरक व सहशालेय उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे नियोजन केले. भाकरी तयार करणे, दिनांकाचे पाढे, चित्ररूपाने पुस्तक तयार करणे, शैक्षणिक शेकोटी, पक्ष्यांच्या पंखांची ओळख, गुणवत्तेची गुढी, शालेय मंत्रिमंडळ, हसत-खेळत धूळपाटी, पाककला, शिक्षणाची वारी, उपस्थिती झेंडे, शालेय सुशोभिकरण, रोपवाटिका, दिवाळी भेटकार्ड, तूर लागवड, रानभाज्या प्रदर्शन, परिसर भेट, रोजच्या वापरातील उपयोगी इंग्रजी शब्द इत्यादी उपक्रम शैक्षणिक वर्षात घेतले.

शाळेची भौगोलिक स्थिती, भौतिक सुविधा, आर्थिक नियोजन, यांवर शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ व पालक, दानशूर व्यक्ती यांच्याबरोबर विचार विनिमय करून उपक्रमांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या सर्व समस्यांचे निराकरण केले.

शाळेभोवतालचा परिसर बराच मोठा असल्याने व गाव शहरापासून खूप दूर असल्याने शालेय पोषण आहारात प्राप्त धान्याव्यतिरिक्त इतर पालेभाज्या, फळभाज्यांचा अत्यल्प वापर होत असे, त्यामुळे शाळेशेजारी मोकळ्या जागेत परसबाग करण्याचे ठरवले.

> *शाळेजवळ उपलब्ध असलेल्या जागेचा वापर करून त्या ठिकाणी परसबाग फुलवली. परसबागेची संकल्पना, निर्मिती व त्याचे फायदे या सर्वांबाबत स्वानुभवावर आधारित लेख.*

**समस्या :**

(१) शहर दूर असल्याने भाज्यांची अनुपलब्धता.

(२) स्वकष्टाची व मेहनतीची कमतरता.

(३) सहशालेय उपक्रमात पालकांचा कमी सहभाग.

(४) परसबागेविषयी नकारात्मक मानसिकता.

(५) पर्यावरणाच्या निरीक्षणाचा अभाव.

**उद्देश :**

(१) परिसराशी मैत्री करणे.

(२) ज्ञान शाळेबाहेरील जगाशी/व्यवहाराशी जोडणे.

(३) स्वनिर्मितीचा आनंद व स्वकष्टाचे महत्त्व जाणवून देणे.

(४) सहशालेय उपक्रमांत पालक व समाजाचा सहभाग वाढवणे.

(५) परसबागेतील विविध भाज्यांचा शालेय पोषण आहारात नियमित वापर करणे.

**उपक्रमाची व्याप्ती/स्तर :**

शाळेत शिक्षकांना जसे आपले अध्यापन तंत्र वापरण्याचे स्वातंत्र्य आहे, तसे विद्यार्थ्यांनाही आपल्या कल्पकतेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य आहे. विद्यार्थ्यांच्या या कल्पकतेला धरून विविध सहशालेय

उपक्रम शाळेत राबविले जातात. त्यासाठीची पूर्वतयारी, नियोजन, कार्यवाही व यशस्विता यांचा विचार करून उपक्रमाची अंमलबजावणी केली. स्वनिर्मिती, वेगळेपण व स्वयं-अध्ययन यांमुळे विद्यार्थी शाळेत रममाण झाले. लोकसहभागामुळे शालेय आंतरक्रिया चांगली झाली.

सदर उपक्रम शाळा स्तरावर घेण्यात आला. शाळेची सेंद्रिय परसबाग तयार झाल्यावर प्रत्येक मुलाला त्याच्या घराशेजारी परसबाग तयार करण्यास सांगून स्पर्धा घेतली.

**कालावधी :**

ऑगस्ट, २०१९ ते फेब्रुवारी, २०२०

**उपक्रमाचा तपशील :**

विद्यार्थ्यांना बालवयातच पर्यावरणाची, परिसराची आवड निर्माण व्हावी, कष्टाच्या कामांची जाणीव व्हावी, या हेतूने विविध भाज्यांची, रोपांची लागवड केल्यानंतर प्रत्येक कामाचे निरीक्षण करून चर्चा केली. सेंद्रिय खते व कीटकनाशके तयार करण्यासाठी आजूबाजूच्या विविध वनस्पती (कडुनिंब, पपई, नेंगड, तुळस, लसूण इत्यादी) व परिसरातील शेणखत, गोमूत्र, ताक, गांडूळ, माती, जाड मीठ, हळद इत्यादींचा वापर केला आणि सेंद्रिय कीटकनाशक शाळेतच तयार केले, ज्याचा वापर परसबागेसाठी केला. शिक्षक व विद्यार्थी यांना आपल्या भूमिका समजावून दिल्या.

**कार्यवाही :**

- वाफे तयार केले.
- पक्के कुंपण तयार केले.
- बियांचे रोपण, शेणखताचा वापर, सेंद्रिय कीटकनाशक फवारणी केली.
- ठिबक सिंचन पद्धतीने पाणी पुरवठा केला.
- तालुका कृषी अधिकारी व कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले.
- भेंडी, वांगी, दुधीभोपळा, पडवळ, मिरची, टोमॅटो, मुळा, चवळी, कोथिंबीर यांची लागवड केली.
- पालकांच्या सहभागाने घरोघरी परसबाग उपक्रम स्पर्धेचे आयोजन.
- पालकसभा घेऊन उपक्रमाची माहिती, कामाचे स्वरूप व प्रत्येकाची भूमिका समजावून दिली.
- प्रत्येक टप्प्याचे निरीक्षण व चर्चा.
- प्रत्येक विद्यार्थ्याने परिसरातील उपलब्ध जागेत परसबाग तयार केली.
- स्पर्धेतील उत्कृष्ट तीन परसबागांना बक्षिसे देऊन सन्मान केला.

**समस्या/अडचणी :**

- परसबागेचे संरक्षण करणे.
- पाणी समस्या.
- कीटकांचा प्रादुर्भाव.

सर्व समस्यांवर सकारात्मक दृष्टिकोनातून मार्ग काढला. मुलांना प्रोत्साहन देऊन क्रियाशील ठेवले. प्रत्यक्ष कृतीतून, अनुभवातून केलेल्या कामात मुलांना अधिक आनंद मिळतो हे लक्षात आले.

**फलनिष्पती :**

- बागकामाविषयी आवड निर्माण झाली.
- निरीक्षणशक्ती सहकार्य, चिकाटी या गुणांची वाढ झाली.
- आपणही काहीतरी वेगळे करू शकतो ही जाणीव होऊन, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला.
- शालेय पोषण आहारात परसबागेतील भाज्यांचा वापर होत असल्याने स्वनिर्मितीचा एक वेगळा आनंद मिळाला.
- पालकांच्या व मोठ्या माणसांच्या कष्टाचे मोल लक्षात आले.
- घरोघरी परसबाग तयार झाली व समाजाचा शाळेविषयीचा दृष्टिकोन आणखी सकारात्मक झाला.

# पर्यावरणस्नेही दिवाळी

**डॉ. शिवनंदा मेहेत्रे**
जि. प. प्रशाला मुलांची, जालना. भ्रमणध्वनी : ९४२१६५७६१४

*यावत् भूमण्डलं धत्ते, सशैल-वन-काननम्।*
*तावद् तिष्ठति मेदिन्यां, संततिः पुत्रपौत्रिकी।।*
*देहान्ते परमं स्थानं, यत्सुरैरपि दुर्लभम्।*
*प्राप्नोति पुरुषो नित्यं, महामायाप्रसादतः।।*

जोपर्यंत या भूतलावर पर्वत, वने, सरोवरे आहेत, तोपर्यंत तुम्ही, तुमची मुले व भावी पिढी सुखाने जगाल. ज्यांना ही गोष्ट कळेल, त्यांना महामायेच्या म्हणजे निसर्गाच्या प्रसादाने देवदुर्लभ असे परमस्थान प्राप्त होईल. आपल्या पूर्वजांचे हे विचारधन विसरून पर्वत, वने, सरोवरे, नद्या-नाले, भूमी, वन्यप्राणी यांचा सर्वनाश करण्याचा मनुष्याने जणू विडाच उचलला आहे. मनुष्य फक्त एवढ्यावरच थांबला नाही, तर तो अधो-दिशेने पृथ्वीच्या गर्भाकडे व ऊर्ध्व-दिशेने अंतराळातसुद्धा झेपावला आहे. आपल्या हस्तक्षेपाने तो तेथेदेखील समस्या निर्माण करत आहे.

पर्यावरण प्रदूषण ही एक प्रक्रिया आहे. ती मानवनिर्मित किंवा निसर्गनिर्मित असू शकते. शब्दशः अर्थ घेतल्यास प्रदूषण म्हणजे पर्यावरणाची हानी करण्याची प्रक्रिया असा अर्थ निघतो. 'नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स', अमेरिका यांनी प्रदूषण म्हणजे जल, वायू आणि भूमी यांच्या भौतिक, रासायनिक किंवा जैविक गुणधर्मांमध्ये घडून येणारा अनैच्छिक बदल, ज्याचे दुष्परिणाम मनुष्य, इतर प्राणी, वनस्पती, सजीव, औद्योगिक प्रगती व नैसर्गिक संपदा यांच्यावर होतो हे सिद्ध केले.

> *दिवाळी हा आनंदाचा सण. दिवाळीत मुलांना किल्ले बनवायला आवडतात. काही जण फटाके वाजवतात. फटाक्यांमुळे वेगवेगळ्या प्रकारचे प्रदूषण होते. या प्रदूषणाचे अनेक दुष्परिणाम होतात. त्यामुळे पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करायची असेल, तर फटाकेमुक्त दिवाळी साजरी केली पाहिजे असा संदेश देणारा लेख.*

पर्यावरणीय दृष्टिकोनातून प्रदूषणाचे पुढील प्रकार (१) वायुप्रदूषण, (२) जलप्रदूषण, (३) भूमिप्रदूषण, (४) ध्वनिप्रदूषण, (५) उष्माप्रदूषण, (६) किरणोत्सारी प्रदूषण, (७) अंतराळ प्रदूषण.

मानवनिर्मित प्रदूषणात प्रामुख्याने ध्वनिप्रदूषण, जलप्रदूषण, वायुप्रदूषण यांचा समावेश होतो. विविध सण-समारंभांतून होणारे वाद्यांचे, संगीताचे कर्कश आवाज, पाण्यात विसर्जित होणारे पदार्थ, मिसळणारी रसायने, हवेत मिसळणारा धूर या बाबी प्रदूषण करतात.

हिंदू धर्मातील विविध सणांपैकी दिवाळी या सणाला आगळेवेगळे महत्त्व आहे. लहानथोरांसाठी नवचैतन्य घेऊन येणारा असा हा सण. दिवाळीच्या दिवसांत सर्वत्र आनंदाचे, जल्लोषाचे वातावरण असते. प्रत्येक जण आनंद साजरा करत असतो; परंतु आपण आनंद साजरा करताना इतरांना काही त्रास तर होणार नाही ना, या गोष्टीचे भान ठेवणे हे सजग नागरिकाचे कर्तव्य आहे.

**(१) वायुप्रदूषण :** फटाक्यांमधून बाहेर पडणाऱ्या विषारी वायूयुक्त धुराचा सर्वांच्याच आरोग्यावर दुष्परिणाम

होतो. फटाकेदेखील स्मॉगमध्ये भर घालतात. ‘स्मॉग म्हणजे, धूर व धुके यांचे मिश्रण होय.’ फटाके वाजवल्याने त्यातून कार्बन डाय–ऑक्साइड व इतर विषारी वायू बाहेर पडतात त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते आणि हवा प्रदूषित होते.

**(२) जलप्रदूषण :** जड धातू उदा., तांबे व इतर रासायनिक घटक यांचा वापर फटाक्यांमध्ये केलेला असतो. ही रसायने पाण्याच्या गुणवत्तेचे मानक म्हटल्या जाणाऱ्या ठरावीक पातळीपेक्षा जास्त सांद्रतेमध्ये मानव आणि जलचर प्राणी यांसाठी हानिकारक असू शकतात.

**(३) भूमिप्रदूषण :** फटाक्यांमुळे हवेतील धुळीचे प्रमाण वाढते व हवा प्रदूषित होतेच; पण हे धुलीकण जमिनीवर येतात. फटाके वाजवल्यानंतर सल्फर, झिंक, कॉपर आणि सोडियम या रसायनांचे अवशेष हवेत व तेच कालांतराने जमिनीवर स्थिर होतात, त्यामुळे जमीन प्रदूषित होते.

**(४) ध्वनिप्रदूषण :** फटाक्यांच्या आवाजामुळे लहान मुलांमध्ये कायमचे बधिरत्व येण्याची शक्यता असते. ध्वनीची तीव्रता जास्त असल्यामुळे श्रवणक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. भाषण–संभाषणाची तीव्रता सुमारे ६० डेसिबल असते. ८० डेसिबलपर्यंतच्या तीव्रतेचा ध्वनी मनुष्य कोणत्याही त्रासाशिवाय ऐकू शकतो. फटाक्यांच्या ध्वनींची तीव्रता जवळजवळ ११० डेसिबल असते. यामुळे कर्कश ध्वनी निर्माण होतो. बहिरेपणा, रक्ताभिसरणावर होणारे दुष्परिणाम, नाडीच्या ठोक्यातील बदल, चिडखोरपणा, भावनिक असंतुलन, बुद्धिभ्रम, निद्रानाश यांसारखे आजार फटाक्यांच्या ध्वनींमुळे बळावतात. एवढेच नाही, तर हृदयविकाराने त्रस्त रुग्णांमध्ये हार्ट ॲटॅक येण्याची शक्यतादेखील वाढते.

**(५) उष्माप्रदूषण :** फटाके वाजविल्यामुळे वातावरणातील उष्णता, कार्बन डाय–ऑक्साइड वायू व अनेक विषारी पदार्थ वाढतात, त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते व प्रदूषित हवा ग्लोबल वार्मिंग ला कारणीभूत ठरते.

**(६) किरणोत्सारी प्रदूषण :** फटाक्यांमधील विविध रासायनिक पदार्थांमुळे पर्यावरण प्रदूषित होते. किरणोत्सारी घटक जास्त काळ पर्यावरणात टिकून राहिले, तर अन्नसाखळीद्वारे सजीवांच्या व मानवाच्या शरीरात शिरतात. त्याचे गंभीर परिणाम किरणोत्सर्गामुळे होतात. कॅन्सर, जनुकातील आनुवंशिक बदल, व्यंग व विकृती संभवते तसेच रोगप्रतिकारक शक्तीचा नाश आणि पर्यायाने मृत्यूदेखील संभवतो.

**(७) अंतराळ प्रदूषण :** अंतराळ प्रदूषण हेदेखील मानवी कृतीतून होणारे प्रदूषण आहे. फटाक्यांमधील काही प्रकार हे खूपच उंच जाऊन तिथे फुटतात. त्याच ठिकाणी फटाक्यांमधील रासायनिक व किरणोत्सारी पदार्थ उंचीवर हवेत वातावरणात मिसळले जातात आणि यामुळे अंतराळातदेखील प्रदूषण वाढते. फटाक्यांमुळे अवकाश जरी उजळलेले दिसत असले, तरी पर्यावरणावर व पर्यायाने मानवी जीवनावर आणि आरोग्यावर त्याचा खूपच वाईट परिणाम दिसून येतो. फक्त मानवच नाही, तर संपूर्ण सजीवसृष्टी म्हणजेच प्राणी व पक्षी यांच्याही जीवनावर फटाक्यांमुळे विपरीत परिणाम दिसून येतो.

दिवसेंदिवस सामान्य नागरिकांमध्ये पर्यावरण प्रदूषणाविषयी जागृती होत आहे. यावर्षीदेखील बऱ्याचशा शाळांमध्ये आपल्या शिक्षक बांधवांनी पर्यावरणपूरक गणपती बनविण्यासंदर्भात कार्यशाळा घेतल्या. शाडूच्या

**(पृष्ठ क्र. ३० वर)**

# रद्दीतून बुद्धीला चालना

**बाळकृष्ण बाचल**
माजी मुख्याध्यापक, मनपा पुणे, विद्यानगर (टिंगरेनगर), पुणे. भ्रमणध्वनी : ९३७३३१०९२९

*वर्तमानपत्रे व नियतकालिके यांतील अनेक सदरांतून विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल अशी माहिती, कथा, सुविचार येत असतात. अनेक शिक्षक रद्दीतील अशा उत्तम बाबींचा शैक्षणिक साहित्य म्हणून वापर करतात. रद्दी हे बुद्धीचे खाद्य होऊ शकते, त्यामुळे वाचनाची आवड जोपासली जाऊ शकते. रद्दीचा उपयोग करून आपण छान छान उपक्रम राबवू शकतो यासाठी चालना आणि प्रेरणा देणारा लेख.*

'शाळा ही शाळेत नसते. वर्तमानपत्रे, उपाहारगृहे यात असते. माणूस जीवनातून शिकतो. फक्त शाळेतून नव्हे; मुलांच्या मनात जिज्ञासेचा दिवा पेटवला, की शिक्षकांचे काम संपते.' हे विचार टॉलस्टॉय यांचे आहेत. अशाच विचारांच्या प्रेरणेतून शिक्षक म्हणून कार्यरत असताना मी एक उपक्रम राबविला.

वर्तमानपत्रे, रद्दी पुस्तके यांमधून गाणी, गोष्टी, शब्दकोडी, रंगीत चित्रे इत्यादींच्या कात्रणांचा संग्रह करून चिकटवही तयार करणे, यासाठी विद्यार्थ्यांना योग्य त्या सूचना दिल्या.

या सूचनांचा उपयोग होईल असे वाटत नव्हते; कारण ही सर्व मुले गरीब घरांतील, झोपड्यांत राहणारी अशी होती; तरीही एक प्रयत्न म्हणून त्यांच्याशी पुन्हा बोलावे असे ठरविले. मी विद्यार्थ्यांना विचारले, ''काय रे मुलांनो, काल मी तुम्हांला चिकटवहीच्या उपक्रमाबद्दल बोललो होतो. कोणी कोणी सुरुवात केली?''

सगळा वर्ग शांतच! धिटाईने एक विद्यार्थी म्हणाला, ''आमच्या घरी पेपरच येत नाही,'' तर दुसरा लगेच म्हणाला, ''यासाठी वह्या कुठून आणायच्या?'' मग लगेच तिसरा म्हणाला, ''गुरुजी, याचा फायदा काय?''



सर्वांच्या तक्रारवजा सूचना ऐकून शांतपणे मी म्हणालो, ''हे पाहा, आज फळ्यावर जो सुविचार लिहिला आहे, तो वाचलात का?''

''मला हे जमणार नाही; असे म्हणणारे काहीच साध्य करत नाहीत'. मुलांनो – हा सुविचार मला रद्दीमधील एका वर्तमानपत्रात वाचावयास मिळाला आणि मग वर्तमानपत्रातील अशाच सुविचारांची कात्रणे कापून एक सुविचारांचा संग्रह माझ्याकडे तयार झाला.''

''पण गुरुजी, हे करत असताना अभ्यास बुडेल ना!'' एकाने शंका व्यक्त केली. त्यावर मी म्हणालो, ''अरे, अभ्यास नसेल, तेव्हा किंवा सुट्टीमध्ये केव्हाही तुम्ही अशी वही तयार करू शकता. त्याला काही वेळेचे बंधन नाही आणि हो मघाशी कोणीतरी म्हणाले, ''आमच्या घरी वर्तमानपत्र (पेपर) येत नाही. काही हरकत नाही! आपल्या ओळखीचे कोणी काका, मामा यांना सांगायचे. 'पेपरची रद्दी दुकानात विकता, ती मला द्या! मी त्याचे पैसे देईन.' नाहीतर

असेही करता येईल, दुकानदाराकडे जायचे एक/दोन किलो रद्दीच्या भावात रद्दी विकत घ्यायची. सवडीने त्यातील गोष्टी, कविता, चित्रे किंवा तुम्हांला जे आवडेल त्याची कात्रणे काढून ठेवायची. काहींना खेळाची आवड असते, तर खेळाडूंबाबत आलेल्या बातम्या, चित्रे अशी सर्वांची कात्रणे काढून ठेवायची. ती एका वहीत चिकटवायची. वहीला छान कव्हर घालून त्यावर तुमचे नाव, शाळेचे नाव, इयत्ता, तुकडी जे काही असेल ते लिहायचे. नावाच्या पूर्वी 'संग्राहक' असे लिहायचे.''

उदा. संग्राहक,

नाव : ..............................................................

इयत्ता : ......................तुकडी........................

शाळा : ..............................................................

एवढे सांगितले तरीही एक जण म्हणाला, ''पण यासाठी वह्या! त्या कुठून आणायच्या!'' मी म्हणालो, ''मागील वर्षाच्या आपण लिहिलेल्या वह्या असतील किंवा आपल्या घरातील मोठे बहीण–भाऊ यांच्या वापरून झालेल्या वह्यांवरसुद्धा अशी कात्रणे चिकटवली तरी चालतील.''

सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व शंका दूर झाल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होते. त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी मी म्हणालो, ''वर्षाच्या शेवटी या सर्व वह्यांचे आपण प्रदर्शन भरवू! प्रत्येकाला छान प्रमाणपत्र देऊ. चांगल्या वहीला बक्षीस देऊ.''

काही दिवसांनी पुन्हा एकदा याविषयी विद्यार्थ्यांना विचारले, पण म्हणावा असा प्रतिसाद मिळाला नाही. मग दुसऱ्या दिवशी मी म्हणालो, ''आज मी तुम्हांला माझीच गोष्ट सांगणार आहे. मी जेव्हा शाळेत जात होतो. त्या वेळी आमच्या घरी एक छोटेसे दुकान होते. मी शाळेतून आलो, की दुकानात बसून अभ्यास करायचो. त्या वेळी दूरदर्शन, मोबाईल अशी कोणतीही साधने नव्हती. अभ्यास नसेल तेव्हा दुकानातील रद्दी पेपर, पुस्तके चाळायचो, त्यातील गोष्टी, गाणी, कविता वाचण्याचा प्रयत्न करायचो. काहींचा अर्थ समजत नसायचा, तरीही वाचायचो. मग असे वाटले, की आपल्याला हे पुन्हा वाचता यायला हवे, म्हणून त्यांच्या कात्रणांचा संग्रह करू लागलो. एका रद्दीतीलच वहीत कविता, बालगीते, गोष्टी, चित्रे चिकटवून ठेवली. एकदा शाळेत हे मी दाखविले. शाबासकी मिळाली.''

मित्रांनो, याचा एक फायदा असा होतो, की या गोष्टी वाचनात आल्या, तर आपली शब्दसंपत्ती वाढते. आपल्याला चांगले बोलता येते, भाषण करता येते. त्यातील एखादा सुविचार, कवितेच्या ओळी सांगता येतात, याचा मी स्वतः अनुभव घेतला आहे; कारण आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे मी सांगत आहे, असे म्हणून माझे अनेक संग्रह त्यांना दाखवले. त्यांना हाताळायला दिले. एक प्रकारे त्यांना प्रेरणा देण्याचे काम केले आणि खरोखरच विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारचे संग्रह तयार केले. वर्षाच्या शेवटी त्याचे प्रदर्शन भरविले. त्यामुळे सर्वांनाच प्रेरणा मिळाली.

रद्दी ही केवळ रद्दी नसून त्यातूनही बुद्धीला चालना मिळते. वाचनाची आवड निर्माण होते. लेखनाची प्रेरणा मिळते. वाचलेले लिहून काढले, तर एकदा लिहिणे म्हणजे दोनदा वाचणे, या न्यायाने वाचता–वाचता पाठही होते किंवा लिहायला वेळ नसेल, तर पुन्हापुन्हा वाचून पाठ केले, की तो कागद असो किंवा पुस्तकातील मजकूर, कवितेच्या ओळी पुन्हा पाहण्याची गरज भासत नाही.

आजच्या गुगल, इंटरनेटच्या जमान्यात याचा काय उपयोग! सर्व काही माहितीतंत्रज्ञानाच्या साहाय्याने मिळते. मग हा खटाटोप कशासाठी! असा प्रश्न मला काही जणांनी विचारला; कारण सेवानिवृत्तीनंतरही मी

**(पृष्ठ क्र. ३० वर)**

# मूल्यमापन आणि कोवळ्या वयातील भय

**सुरेंद्र करवंदे**
जि. प. प्राथ. शाळा माळेगाव केंद्र., वाघूळ (ज.) ता., जि. जालना. भ्रमणध्वनी : ९९२३३३८६१६

> *मूल्यमापन ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून मूल्यमापन हेच अध्ययन समजल्यास विद्यार्थ्यांना त्याचा ताण येणार नाही. यावर प्रकाशझोत टाकणारा हा लेख. Assessment for learning, Assessment as learning and Assessment of learning या मूल्यमापन दृष्टिकोनांचा अवलंब आलटून-पालटून करावा.*

फार पूर्वी मूल्यमापन हे निपुणता तपासण्याचे एक साधन म्हणून वापरले जायचे. निपुणता तपासण्यासाठी अपेक्षित अध्ययन क्षमतेतील परमोच्च निष्पत्ती प्राप्त झाली किंवा कसे हे तपासले जायचे. काळाच्या प्रवाहात मूल्यमापनविषयक संकल्पना व धारणा अधिक सुदृढ होत गेल्या. नंतर कालांतराने मूल्यमापनाच्या उद्देशांमध्येही आमूलाग्र बदल घडून आले. तसेच जागतिक पातळीवर त्याची उपयुक्ततासुद्धा बहुअंगी झालेली दिसते.

दुर्दैवाने आजही आपल्या देशात बऱ्याच क्षेत्रांत व विविध अध्यापन संस्थांमध्ये मूल्यमापन हे केवळ निपुणता तपासण्यासाठी वापरले जाते. मूल्यमापनापूर्वी अध्यापनाची व मूल्यमापनाची उद्दिष्टे अध्ययनार्थींना ज्ञात असणे अभिप्रेत आहे; परंतु अभावानेच तसे घडताना दिसते. याचा परिणाम म्हणून अध्ययनार्थी हे संख्यात्मक प्राप्तीलाच अधिक महत्त्व देताना दिसून येतात व व्यवस्थाही नकळत त्यांना त्याच दिशेने घेऊन जाताना दिसते. ही निपुणता तपासताना अनेकदा अध्ययनातील अडथळे, पूर्वज्ञान, अध्ययन सिद्धता या बाबींकडे दुर्लक्ष केले जाते किंवा अजाणतेपणे दुर्लक्ष होते.



मूल्यमापनाचे प्रामुख्याने अध्ययनासाठी मूल्यमापन (Assessment for learning), अध्ययन म्हणून मूल्यमापन (Assessment as learning) व अध्ययनाचे मूल्यमापन (Assessment for learning), हे तीन उद्देश जागतिक पातळीवर प्रचलित आहेत. यामध्ये अध्ययनासाठी मूल्यमापन (Assessment for learning), हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून मूल्यमापन केल्यास अध्ययनार्थींचे अध्ययनातील कच्चे दुवे, अध्ययन पद्धती, प्रसंगी अध्यापन पद्धतीतील आवश्यक असलेले बदल, अध्ययनार्थीची अध्ययन सिद्धता या बाबी कळून येतात. या सर्व बाबींचे अध्यापकाला किंवा मूल्यमापनकर्त्याला आकलन झाले म्हणजे अध्ययन, तसेच मूल्यमापनसुद्धा अध्ययनस्नेही व विद्यार्थिस्नेही होण्यास मदत होते. याचा फार मोठा सकारात्मक परिणाम म्हणजे अध्ययनार्थीवर येणारा अध्ययनाचा तसेच मूल्यमापनाचा ताण टाळणे शक्य होऊन, अध्ययन व मूल्यमापन या दोन्ही प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होते.

अध्ययन म्हणून मूल्यमापन (Assessment as learning) हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून केलेले मूल्यमापन हे बव्हंशी अध्ययनार्थीने स्वतःचे केलेले मूल्यमापन असते. या मूल्यमापनाच्या माध्यमातून

अध्ययनार्थी हे स्वतःची शक्तिस्थळे, कच्चे दुवे, अध्ययनाची पद्धत, स्वतःला आवश्यक अतिरिक्त मार्गदर्शनाचे क्षेत्र व पद्धती याबाबत अध्यापकाला अवगत करू शकतात. ज्या आधारे अध्यापक आपली अध्यापन पद्धती निवडू शकतात; अध्ययन म्हणून मूल्यमापन (Assessment as learning) या पद्धतीचा वापर करण्यासाठी आज सहज उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचीसुद्धा मदत घेतली जाऊ शकते, ज्याद्वारे काही स्वयंमूल्यमापनाचे ॲप्स विकसित करून कच्चे दुवे भरून काढण्यासाठी प्रत्याभरणाची व्यवस्थासुद्धा केली जाऊ शकते, ज्यामुळे स्पर्धा व तुलना यांमुळे येणारा ताण कमी करण्यास मदत होऊ शकते.

खरे म्हणजे अध्ययनाचे मूल्यमापन हा प्रकार अध्ययन पूर्ण झाल्याची खात्री पटल्यावरच वापरायला हवा. त्यासाठी अध्ययनाचे मूल्यमापन हे वरील मूल्यमापनाचे तितक्याच महत्त्वाचे दोन प्रकार वापरून विद्यार्थिस्नेही बनवावे लागेल, जेणेकरून परीक्षेगणिक वाढत जाणारी मूल्यमापनाची भीती, स्पर्धेचे ओझे व अपयशाचे जीवघेणे भय यांपासून विद्यार्थ्यांची सुटका करता येईल; अन्यथा मूल्यमापन हे भवितव्यासाठी न राहता ते निरागस बालकांच्या तणावाचा स्रोत बनेल.

▣▣▣

---

**(पृष्ठ क्र. २६ वरून)**

मातीपासून गणपती तयार करून, त्याची स्थापना घरोघरी करण्यात आली. यामुळे खूप मोठ्या प्रमाणात जलप्रदूषणास नक्कीच आळा बसला.

पर्यावरणस्नेही दिवाळी साजरी करण्यासाठी देखील खूप शाळांमध्ये कार्यक्रम घेण्यात येतात. एक आगळीवेगळी दिवाळी, प्रदूषणमुक्त दिवाळी असे विद्यार्थ्यांच्या मनावर आणि पर्यायाने पालकांच्या व समाजाच्या मनावर बिंबविण्यात यावे. प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी केल्यानंतर होणारे फायदे म्हणजेच, प्रदूषण तर होणार नाहीच; परंतु फटाक्यांतून वाचलेल्या पैशातून शैक्षणिक साहित्य आणून ते गरजू व गरीब विद्यार्थ्यांना देऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी निश्चितच मदत होईल. आपण फटाके विकत घेऊन पैसा अनाठायी खर्च करतो, तर काही कुटुंबात सणांच्या दिवशी चूलदेखील पेटत नाही. अशा गरीब लोकांना आपण फटाक्यांच्या वाचलेल्या पैशांतून मिठाईचे वाटप करू शकतो. शहरातील अनाथ आश्रम, वृद्धाश्रम तसेच रेल्वेस्टेशन, बसस्थानक परिसरात असलेल्या गरजू लोकांना मदत करता येईल. या दिवाळीत एखाद्या अंधाऱ्या कोनाड्यात दीप लावू. गरजवंताला मदतीचा हात देऊ आणि प्रदूषणमुक्त, फटाकेमुक्त म्हणजेच, पर्यावरणस्नेही दिवाळी आनंदाने साजरी करू.

दिवाळीच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा !

▣▣▣

---

**(पृष्ठ क्र. २८ वरून)**

अनेक संग्रह तयार केले आहेत. उदा.–

(१) बोधकथा, (२) बालगीते, (३) सुविचार संग्रह, (४) चित्रांचा संग्रह, (५) विविध प्रकारच्या दिनदर्शिका

रद्दीत एक दिनदर्शिका अशी मिळाली, की त्यावर प्रत्येक महिन्याला एक सर्वांना माहीत असलेली किंवा काळाच्या ओघात विस्मृतीत गेलेली अशी कविता रंगीत चित्रासह आली होती.

अशा अनेक गोष्टी रद्दीतून प्राप्त झाल्या आणि त्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि वेळ कसा गेला हे समजलेही नाही!

शेवटी मला एवढेच म्हणावेसे वाटते...

*रद्दीतून बुद्धीला मिळावी चालना,*
*एकापासून अनेकांस मिळावी प्रेरणा!*

▣▣▣

# गोष्ट छोटी डोंगराएवढी

**खंडू मोरे**
जि. प. प्राथ. शाळा फांगदर, ता. देवळा, जि. नाशिक. भ्रमणध्वनी : ९४२३९३२६९८

*शाळेत परिपाठातून किंवा वर्गअध्यापनातून जाणीवपूर्वक केलेले संस्कार अथवा नकळत झालेले संस्कार यांतून मुलांची जडणघडण होते. ती त्यांच्या वागण्या–बोलण्यात दिसते. शाळेत प्रामाणिकपणाची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. या लेखातही मुलांचे संस्कार आणि त्यांच्या प्रामाणिकपणाची काही उदाहरणे दिसतात.*

बालवयात मुलांना योग्य ते मार्गदर्शन मिळणे, योग्य वळण लावणे यालाच तर संस्कार म्हणतात! पशुपक्ष्यांना शिकवले, तर तेदेखील मनुष्याप्रमाणे बोलू शकतात. योग्य संस्कार झाले, की विचार, बुद्धी, आचार, ज्ञान कर्तृत्व इत्यादी गुणांचा उत्कर्ष होऊन प्रगती होते, म्हणूनच योग्य विचारांचे संस्कार करणे खूप गरजेचे आहे; कारण बालवयात झालेले संस्कार मोठेपणी अंगवळणी पडतात. या संस्कारांचे प्रतिबिंब आपल्या वागण्या–बोलण्यातून, राहणीमानातून, नीटनेटकेपणातून दिसून येते. संस्काराचे बीज योग्य प्रकारे पेरले गेले, तर चांगल्या प्रकारची भावी पिढी तयार होण्यास मदत होते. लहानपणीच जर मुलांना नीतिमूल्यांचे शिक्षण दिले गेले, तर एक चांगला समाज निर्माण होण्यास हातभार लागू शकतो, या सगळ्याचा विचार करून उत्तम संस्कार घडतील अशा प्रकारचा उपक्रम सुरू करण्याचे ठरविले. दुर्गम भागातील शाळेत सुरू केलेल्या या छोट्या उपक्रमातून, हा प्रयत्न खूप छोटा असला, तरी त्याचे मोल अंधारातल्या पणतीसारखे शिक्षक म्हणून आम्हांला जाणवले.

याचे उत्तम उदाहरण आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांचे वर्तन.

आमची शाळा ही आदिवासी वस्तीवरील वस्तीशाळा आहे. शाळेत येणारी सर्वच मुले ही शेतमजूर व मजुरी करणाऱ्या पालकांची आहेत. काही वेळेस या मुलांच्या शैक्षणिक गरजादेखील पूर्ण होत नाहीत. मात्र आम्ही शिक्षक समाजातून या मुलांना वही, पेन, पेन्सिल, खोडरबर, कंपासपेटी, दप्तर या गोष्टी मिळवून देत असतो. शालेय परिसरात वावरताना या गोष्टी मुलांकडून सहज गहाळ होतात, म्हणून आम्ही शिक्षकांनी या हरवलेल्या गोष्टी सापडल्यावर त्या शाळेत जमा करण्यासाठी 'हरवले ते सापडले' हा बॉक्स ठेवला आहे. ज्या काही गोष्टी शालेय परिसरात सापडतील, त्या सर्व गोष्टी मुले या बॉक्समध्ये जमा करतात. सापडलेल्या वस्तू या चिमुकल्यांनी परत केल्यावर परिपाठात आम्ही त्यांचे कौतुक करत असतो.

एकदा शाळेतील दुसरीच्या विद्यार्थ्यांना सहशालेय पुस्तकांसाठी चाळीस रुपये आणायला सांगितले होते. दुसरीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी पैसे आणले. वर्गातील शिवम मोरे याने पन्नास रुपये आणले. मात्र शालेय सफाईच्या वेळेस त्याची पन्नास रुपयांची नोट खिशातून पडली. त्याने ती शोधली मात्र त्याला काही सापडली नाही. बाकीच्या विद्यार्थ्यांनी माझ्याकडे पैसे जमा केले. पैसे सापडत नसल्याने शिवम घाबरला होता. इकडे–तिकडे पैसे शोधत होता. पैसे हरवल्याने तो

रडकुंडीला आलेला सर्वांनीच पाहिला होता. तिसरीच्या वर्गातील सार्थक याला ते पैसे सापडले होते. त्याने परस्पर शिवमचे पैसे त्याला परत केले. इतर मुलांनी परिपाठ सुरू करण्याच्या वेळेस आम्हांला ही घटना सांगितली. प्रामाणिकपणे शाळेच्या आवारात सापडलेले पैसे परत केल्याबद्दल सार्थकचे परिपाठाच्या वेळेस आम्ही शिक्षकांनी पेन देऊन कौतुक केले. हा प्रयत्न खूप छोटा असला, तरी आम्हां शिक्षकांच्या दृष्टीने त्याचे मोल खूप मोठे आहे. गोष्ट खूप छोटी आहे, पण यामुळे मुलांच्या मनावर प्रामाणिकपणाचे संस्कार होतात हे मात्र या प्रसंगातून जाणवले!

वयाच्या शून्य ते बारा वर्षांपर्यंत मेंदूचा विकास झपाट्याने होत असतो. त्यामुळे माती ओली असतानाच तिला योग्य तो आकार द्यायला हवा. संस्कार संस्कार तरी कशाला म्हणतात! मुले केवळ आपले अनुकरण करत असतात. मुलांच्या वाढीसाठी पोषक वातावरण, योग्य वैचारिक खाद्य मिळाले, की त्यांच्यावर होणारे संस्कार हे नक्कीच प्रभावी असतात. शाळेने केलेल्या या संस्कारांची रुजवण झालेली आम्हांला दुसऱ्या एका प्रसंगातून अनुभवायला मिळाली.

दुसरा प्रसंग हा शाळेतील चौथीच्या वर्गात शिकणारा दुर्गेश बागुल याच्या बाबतीत घडलेला. या विद्यार्थ्याला शाळेत येताना रस्त्यात एक मोबाईल सापडला. त्याने तो लगेचच वर्गशिक्षकांकडे आणून दिला. मोबाईल बंद अवस्थेत असल्याने सायंकाळी तो घरी जाऊन सुरू केला व मोबाईल कोणाचा याचा शोध लावला. आदिवासी वस्तीवर विक्रीसाठी येणाऱ्या दुकानदाराचा तो फोन असल्याचे लक्षात आले. आम्ही त्याच्याशी संपर्क साधून त्या व्यक्तीस मोबाईल परत केला. हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने त्याला आनंद झाला. सध्या मोबाईलचे प्रचंड वेड असताना व एकटा असताना मोबाईल सापडला, तरीदेखील या विद्यार्थ्याने प्रामाणिकपणे मोबाईल परत केला याचा आम्हांला प्रचंड आनंद झाला. या गोष्टीचे समाजमाध्यमातून मोठे कौतुक झाले. शाळा, गाव व शिक्षण विभागाने या मुलाचे कौतुक केले. शाळेत सुरू केलेल्या 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आम्ही नीतिमूल्ये रुजवू शकलो.

मुलांवर होणारे संस्कार, त्यांना लागणाऱ्या सवयी, त्यांची भाषा हे सगळेच त्यांच्या सभोवतालच्या वातावरणावर अवलंबून असते. मुले बहुतेक गोष्टी त्यांचे सहकारी, मित्र, कुटुंबीय यांच्याकडून शिकत असतात. काही वेळा अगदी अनुकरणसुद्धा करतात. बऱ्याच वेळा असा अनुभव आहे, की मुले वाईट सवयी पटकन आत्मसात करतात, पण त्यांच्यात चांगल्या सवयी रुजायला मात्र खूप वेळ लागतो आणि खूप मेहनत घ्यावी लागते.

आजही शिस्तीच्या चष्म्यातून मुलांकडे पाहिले जाते. मुलांना चाचा नेहरू, अब्राहम लिंकन, श्यामची आई यांच्या गोष्टी सांगणारे आजी-आजोबा दुर्मीळ झाले आहेत. कुटुंब विभक्त झाल्यामुळे घरांत माणसांची वर्दळ कमी झाली आहे. आपल्या मुलांना सर्व प्रकारच्या भौतिक गोष्टी उपलब्ध करून द्याव्यात असे पालकांना वाटते, मात्र त्यामुळे वळण, शिस्त, चांगले आचार-विचार या गोष्टी कमी होत चालल्या आहेत. या गोष्टी मुलांमध्ये कायमस्वरूपी रुजवण्यासाठी आम्ही आमच्या भागातील शाळेत 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' हा उपक्रम सुरू केला. या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांमध्ये डोंगराएवढा फरक नक्कीच पडेल, हे मात्र अशा प्रसंगातून नक्की जाणवते!

# करूया मनोरंजन मुलांचे

**पी. एम. काळे**
संजीवराजेनगर, फलटण, जि. सातारा. भ्रमणध्वनी : ९८२३२५७०६६

*लहान मुलांना गोष्टी आवडतात. गाणी, गोष्टी, बडबडगीते, अंगाईगीते यातून नकळतपणे बालमनावर संस्कार होत असतात. यासाठी लहान मुलांना हे ऐकवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. आईच्या बोलातून, गीतातून मुलांवर कसे संस्कार होतात याचे उदाहरणासह अनेक दाखले देत विवेचन केलेला लेख. खास बालदिनानिमित्त वाचकांसाठी.*

मुले ही देवाघरची फुले! बालमनाला समजून, उमजून त्याचे भरणपोषण केले, की बालविकास साधला जातो. मुलाची पहिली ४-५ वर्षे या दृष्टीने महत्त्वाची ठरतात. या काळात बालमन हे अत्यंत गुणग्राही (Receptive) व कुंभाराच्या चाकावरील चिखलाप्रमाणे (mouldable) असते. देईल तो आकार ते सहज धारण करते. ब्लादिमीर लेनिन या रशियन शिक्षणतज्ज्ञाने म्हटले आहे, 'Give me a child for the first five years of his life and he will be mine forever!' याचाच अर्थ असा, की पहिल्या ४-५ वर्षांत मी जे काही बरे-वाईट संस्कार त्या मुलावर करेन, ते उर्वरित आयुष्यात त्याच्याबरोबर राहतील. हेच दुसऱ्या शब्दांत एका शिक्षणतज्ज्ञाने म्हटले आहे, की 'Give me the first five years of the child and take the rest of his life. What I have done in the first five years, you can't undo it in the rest of his life.' माझी ५ वर्षांतील मुलाची घडणावळ तुम्ही त्याच्या उर्वरित आयुष्यात मोडू-तोडू शकणार नाही. येथेच आई-वडील, आजी-आजोबा व इतर नातेवाईकांची भूमिका फार महत्त्वाची ठरते.

बालमनाची जडणघडण करण्याचे शिवधनुष्य पेलण्यासाठी संगीत, खेळ, गोष्टी, कल्पनाशक्ती पूरक आणि तदनुषंगिक अनुभूतींचा समर्पक उपयोग करता येऊ शकतो.

संगीत हे वैश्विक आहे. ते सर्वांना रिझविते. बालमनाला तर ते पटकन भुरळ पाडते. निंबोणीच्या झाडासोबत, चांदोबाच्या साक्षीने झोपेला प्रसन्न करणारी अंगाईगीते प्रत्येकाचे बालपण समृद्ध करीत आली आहेत.

(१) चांदोबा, चांदोबा भागलास का? निंबोणीच्या झाडामागे लपलास का?

(२) निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई, आज माझ्या पाडसाला झोप का गं येत नाही?

(३) बाळा, जो जो रे, जो जो

(४) जु जु जु जु जु जु जु जु
यशोदा का नंदलाला ब्रिज का उजाला है।
मेरे लाल से तो सारा जग झिलमिलाये।

या व अशाच इतर अंगाईगीतांमधून 'नीज, नीज माझ्या बाळा' हे आर्जव करत त्याला झोपवता येऊ शकते. येथे, 'मला गाण्याचे अंग नाही, मला गाता येत नाही, माझा आवाज चांगला नाही' अशी लंगडी कारणे नकोत. प्रत्येक मातेला सुमन कल्याणपूर किंवा आशा, उषाचा कंठ थोडाच लाभणार आहे? आणि महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक बाळाला त्याच्या आईचा आवाज हा

सर्वांत जवळचा, प्रेमाचा, मंजूळ अगदी लतादीदींच्या आवाजासारखा असतो. सुमधुर, मंद, नादमय स्वरातून प्रकटणारे नादब्रह्म थेट बालमनाला जाऊन भिडते. बाळ झोपी जाते. मनोरंजनातून मिळालेली ही झोप त्याला आरोग्याच्या गावी घेऊन जाते. चांगली झोप म्हणजे अर्थातच चांगले व उत्तम आरोग्य. ही तर शिक्षणासाठी अनौपचारिक वा औपचारिक अत्यावश्यक बाबच (Pre-requisite) आहे.

बालकाचे मुख्य व मोठे काम म्हणजे खेळणे. होय खे–ळ–णे. चांदव्यातील नानाविध रंगांचे व आकारांचे पशुपक्षी, तारे यांना पाहून हातपाय झाडणे हा त्याचा पहिला खेळ. पाळणा हलला, की चांदव्यातील जगही हलते. ते बघून मूल स्वतःच स्वतःची करमणूक करून घेते. चेकाळते. मग काय हवेत लाथा–बुक्क्यांचा भडिमार! बूड आले, की त्याचा अंगणात प्रवेश होतो. येथे वरण–भाताची मेजवानी सुरू झाली, की चिऊ, काऊ, माऊ, भू–भू येतातच जोडीला. चांदव्यातील जग विस्तारते तेही जिवंत स्वरूपात! याला परिसर अभ्यास म्हणायचे का? हाताला येईल ते धरायचे व फेकायचे. आनंदच आनंद! नंतर भिंतीला धरत उभे राहण्यातील मजा काही निराळीच. मग वॉकर येतो. त्यात बसून घरभर फिरले, की जग कवेत घेतल्याचा आनंद. काही दिवसांनी वॉकर जातो. मूल स्वतःच चालू, फिरू लागते. पळायचे, पडायचे, उभे रहायचे, पुन्हा पळायचे या खेळाला निद्राधीन होईपर्यंत सुट्टी नाही. नंतर चेंडू–फळी, ठोकळे जोडून आकार बनविणे, पकडापकडी खेळणे, उड्या मारणे, ट्रायसायकल चालविणे, अंघोळीच्या वेळी पाण्यात खेळणे, समवयस्कांशी व पालकांशी खेळणे. अशा विविध खेळांतून बालकाचे मनोरंजन तर होतेच शिवाय शारीरिक हालचालींमध्ये समन्वय साधण्याचे कौशल्य प्राप्त होते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शरीर व मन सुदृढ होते. सबल देही, सबल मन. Sound mind in sound body. हेच पुढील औपचारिक शिक्षणाला पूरक (supportive) ठरणार आहे.

हसत–खेळत संस्कारांची पेरणी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे कथा व गोष्टी. मुले देहभान विसरून गोष्टी ऐकतात. एक होता राजा... एकदा काय झालं ..., फार फार वर्षांपूर्वी... अशा वाक्यांशाने सुरू होणाऱ्या गोष्टी मनोरंजनातून संस्कारांची शिकवण देणारा खजिनाच जणू! एक होता राजा... या वाक्यांशासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंगातून कित्येक कथा तयार झाल्या. 'गड आला, पण सिंह गेला' यातून स्वामिनिष्ठा, 'सुभेदारची सून' यामधून स्त्री–आदर, 'आग्र्याहून सुटका' यातून मुत्सद्देगिरी, 'हिरकणी'तून मातृप्रेम अधोरेखित करता येईल.

'फार फार वर्षांपूर्वी... या वाक्यांशाने सुरुवात करून श्रावणबाळाची मातृ–पितृभक्ती, ध्रुवबाळाची जिद्द व दृढनिश्चय बालकांच्या गळी उतरविता येईल. एकदा काय झाले... ने सुरुवात करून 'मुंगी, कबुतर व शिकारी' यांच्या कथेतून उपकाराची परतफेड उपकारानेच. लाकूडतोड्याच्या गोष्टीतून प्रामाणिकपणा, 'शुक्रवारच्या कथेतून' श्रीमंतीचे गर्वहरण, 'चल रे भोपळ्या'तून शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ ही शिकवण मनोरंजनातून रुजविता येईल. रामायण, महाभारतात तर संस्कारक्षम कथांचा खजिनाच आहे.

बालकांच्या कल्पनाही भन्नाट असतात. सौंदर्य व आशा–अपेक्षांनी भरलेल्या असतात.

*माझ्या मामाची रंगीत गाडी हो*

*तिला खिल्लार बैलांची जोडी हो.*

अशा कल्पनात मुले रमतात. मामाची ही गाडी दौडत, धावत, उसळ्या घेत येणार व त्यांना आजोळी घेऊन जाणार. बैलांच्या गळ्यातील घुंगूरमाळांचा व बैलांच्या पावलांचा टप्टप् आवाज त्यांना ऐकायलाही यायला लागतो.

कार्यप्रवण करणारे, सर्वांगसुंदर शिक्षण देणारे गुरुदेव रवींद्रनाथ टागोर म्हणतात. 'Child must be exposed to the Sunrise, Sunset and the flying birds in the sky, leaving deep impressions on its young mind. मुलाला सूर्योदय, सूर्यास्त व आकाशात उडणारे पक्षी आवर्जून दाखविले पाहिजेत, जे त्याच्या कोवळ्या मनावर खोल परिणाम करतात. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना रामेश्वरमच्या किनाऱ्यावर उडणारे पक्षी पाहूनच विमानाची कल्पना सुचली होती. सूर्योदय व सूर्यास्ताची प्रत्यक्ष अनुभूती घेतल्याशिवाय का कवीने या पूर्वेच्या राजाला काव्यातून उजागर केले?

१४ नोव्हेंबरला, 'बालदिन' साजरा केला जातो. तो असा एका दिवसापुरता मर्यादित न राहता, दररोज साजरा केला जावा. आधुनिक भारताच्या शिलेदारांची ही औपचारिक शिक्षणाची दमदार पूर्वतयारी ठरेल, तीही भरपूर मनोरंजनातून.

## थोडी गंमत

**नंदा कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९०२८३४२७०४

ज्या चौकोनाखाली रेघ आहे, त्या चौकोनात येणारी अक्षरे दिलेल्या सूचक शब्दांवरून शोधून त्या त्या चौकोनात लिहा व शब्द पूर्ण करा. हे सर्व शब्द सणाशी संबंधित आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) | □ □ □ □ □ | एक पेय |
| (२) | □ □ □ □ □ □ | पैसा |
| (३) | □ □ □ | कपडा उसवल्यावर घालावे लागतात. |
| (४) | □ □ □ □ □ □ | प्रत्येकी |
| (५) | □ □ □ | लहान मुलांना आवडणारा एक खाऊ. |
| (६) | □ □ □ □ | नाण्याचे नाव |
| (७) | □ □ □ □ □ □ | प्रश्नार्थक शब्द |
| (८) | □ □ □ □ □ | लोक |
| (९) | □ □ □ | न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय |
| (१०) | □ □ □ □ | एक नाते |

# मुलांचा अमूल्य खजिना

**युवराज माने**
जि. प. प्राथ. शाळा पारडी, ता. सेलू, जि. परभणी. भ्रमणध्वनी : ७५१७४७८५७०

*लहान मुले ज्या वस्तू जमा करतात, तो कचरा नसून त्यांचा अनमोल खजिना असतो. तो शिक्षणात कसा उपयोगी ठरतो ते दर्शवणारा अनुभवाधारित लेख.*

मुलांना त्यांच्या मनाप्रमाणे शाळेत सर्व काही मिळू लागल्यास शाळा त्यांना आवडू लागते आणि मुलांसाठी शाळा हा नितांत सुंदर प्रवास ठरू लागतो. प्राथमिक शाळेतील पहिल्या वर्गातील प्रवास हा मुलांसाठीचा अत्यंत नाजूक प्रवास असतो. रुजायचे कुठे हे ठरल्यावर मुळे लवकर जीव धरतात. एकदा का शाळा म्हणजे आनंद असे मुलांच्या डोक्यात पक्के झाले, की ती शाळेपासून अजिबात दूर जात नाहीत.

अगदी शाळेच्या पहिल्या दिवसापासून मुलांना शाळेत कसल्याही प्रकारचे बंधन किंवा भीती वाटावी असे वातावरण आम्ही ठेवले नव्हते. वर्गातील सर्व मुले आता अतिशय आनंदी वातावरणामध्ये शाळेत रमत होती. गुरुजी, म्हणजे आपले असे मित्र आहेत, की ज्यांच्याजवळ मनमोकळे बोलले तरी चालते हे सर्व मुलांनी गृहीत धरले आणि ते सर्व जण मला एकेरी संबोधू लागले. हे आमच्या मैत्रीचे खास वैशिष्ट्य होते. मुले दिवसभरात मला काहीना काही सतत सांगत असतात. मी अजिबात न कंटाळता प्रत्येकाचे म्हणणे ऐकत होतो. प्रत्येकाला त्याचा आनंद होत होता. सहल गाडीपासून तर मुले आता चांगलीच फुलू लागली होती. वेगवेगळ्या प्रसंगातून मुलांचे वेगळेपण लक्षात येऊ लागले होते. प्रत्येकात काहीना काहीतरी वेगळे वैशिष्ट्य आहे हे लक्षात येत होते. छोट्या हृदयात काय चालले आहे हे समजून घेत त्यांना भरपूर वेळ देणे सुरू होते.

कोणाला तरी काहीतरी दाखवणे व सांगणे ही माणसाची आदिम गरज आहे. सकाळी आल्याबरोबर काहीना काही सांगण्यासोबत, दाखवण्याचाही कार्यक्रम सुरू झाला. एके दिवशी ईश्वरी वर्गात आल्याबरोबर सांगू लागली, की ''गुरुजी, आमच्या इथे नवीन बाळ आले आहे. ते अगदी माझ्या आईसारखे दिसते. त्याचे हात, पाय खूप मऊमऊ आहेत, पण ते रात्री लै रडते.'' आजी म्हणते, 'तू पण अशीच रडत होती.' ईश्वरीचे हे बोलणे आम्ही सर्व जण ऐकत होतो. त्या वेळी ममता आपल्या पिशवीत पुन्हापुन्हा डोकावून पाहत होती. तिच्या शेजारी बसलेल्या दीक्षाने मला सांगितले, ''गुरुजी, ममताने पिशवीत काहीतरी आणले आहे.'' लगेच ममताने पिशवी बंद करून टाकली. मी ममताला जवळ बोलावले. तिला पिशवीमध्ये काय आणले आहे ते दाखवण्यास सांगितले. तिने वेगवेगळ्या आकाराचे शंख-शिंपले व वेगवेगळ्या आकारातील, रंगातील दगड आणले होते. ते सर्व काढून मी टेबलावर मांडले. वेगवेगळ्या आकारातील शंख-शिंपले व वेगवेगळ्या रंगांचे दगड पाहून सर्व मुलांना आनंद झाला. ''शंख आणि शिंपले हे सर्व कोठून आणले, तुला हे कोठे मिळाले?'' असे विचारले असता, ''मी मामाच्या गावाला गेले होते. तिथे नदी आहे तिथून आणले.'' असे तिने सांगितले. वेगवेगळ्या रंगांचे पण दगड असतात हे मुलांना नव्यानेच

कळले. ममताने पिशवीत दगड-गोटे आणले तरीही गुरुजींनी काही म्हटले नाही, हे मुलांनी अलगदपणे मनात टिपले आणि दुसऱ्या दिवशीपासून प्रत्येक मुलाचा घरी असलेला अनमोल खजिना सर्वांसाठीच खुला होऊ लागला. ममताने आणलेला शंख-शिंपल्यांचा खजिना वर्गातच सर्वांसाठी ठेवण्यात आला.

दुसऱ्या दिवशी अंकिताने आपल्या शेतात मिळालेले सुंदर मोरपीस पुस्तकांमध्ये ठेवून माझ्यासाठी आणले. मी तिला ते परत करू लागलो, तर ती म्हणाली, ''गुरुजी, तुमच्यासाठीच आणले आहे.'' ते मोरपीस मी शाळेतील फळ्यावर अलगदपणे लटकवले. मुलांना ते आवडले. नम्रताने तिच्या घरच्या गुलाबाची वेगवेगळ्या रंगांची फुले आणली होती. तिने पिशवीमधून पांढऱ्या, पिवळ्या व गुलाबी रंगांची गुलाबाची फुले बाहेर काढताच मुलांनी टाळ्या वाजवल्या. काल यशने छान गोष्ट सांगितल्याबद्दल ती फुले त्याला देण्यात आली. दुसऱ्या दिवशी अर्जुनने व रेश्माने आपल्या शेतातून वेगवेगळ्या काड्या एकत्र करून बैलगाडी, टिकाव, कुदळ, चारपाई बनवून आणली होती. हे पाहून सर्व मुलांना आश्चर्य वाटले. कार्तिकने सुगरणीचा खोपा आणला होता. तो पाहण्यासाठी सर्व मुलांनी गर्दी केली. पायलनेही आपल्या पिशवीमधून जमवलेला तिचा खजिना बाहेर काढला. एकमेकात डोके खुपसून मुले पाहू लागली. पायलने आपल्या पिशवीतील खजिना काढून माझ्यासमोर टेबलावर मांडून ठेवला. हात तुटलेली बाहुली, छोटी छोटी मातीची भांडी, वेगवेगळ्या आकाराची प्लॅस्टिकची टोपणे, आईच्या केसांना लावायच्या वेगवेगळ्या पिना, कुंकवाच्या डब्या, आईच्या बांगड्या, टिकल्या, छोटेसे भिंग, कंगवा अशा पायलच्या खजिन्याने पूर्ण टेबल सजून गेले. टेबलावर हा खजिना मांडताना तिच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

आपापला खजिना दाखवण्याच्या या आनंद सोहळ्यास आताच सुरुवात झाली होती. मुले एकमेकांचे पाहून आपापला खजिना वर्गात आणून सर्वांसमोर खुला करण्यासाठी चढाओढ करू लागली. आपल्या मित्रांपेक्षा आपला खजिना किती जास्त आहे, हे दाखवण्यात प्रत्येकाला मजा वाटू लागली. मुलांच्या पाठीवर बसून पुस्तकांसोबत त्यांचा अमूल्य असा खजिना वर्गात पोहोचू लागला. वर्गाचा प्रत्येक कोपरा मुलांच्या या खजिन्याने समृद्ध होऊ लागला. आमचा वर्गही अंतर्बाह्य उजळू लागला. चिमुकल्या पावलांचे हे आकाश आता सुंदर होऊ लागले. माझ्या मुलांचा हा खजिना पाहून मला स्वतःला श्रीमंत झाल्यासारखे वाटू लागले. मुलांनी आणलेला हा खजिना वर्गातच खेळण्यासाठी ठेवावा, असे ठरले आणि मुलांनी ते मोठ्या मनाने कबूलही केले. कोणीतरी आपल्याला चांगले म्हणावे ही मुलांची मानसिक गरज असते. कौतुकाचे दोन शब्द, पाठीवरची शाबासकीची थाप फार प्रेरक ठरते. वर्गातील प्रत्येक मुलाचा खजिना टेबलावर मांडल्यावर आम्ही सर्व जण त्यांच्या खजिन्याविषयी चर्चा करू लागलो. त्यांनी जमवलेल्या खजिन्याचे कौतुकही केले जाऊ लागले. कौतुकाने प्रत्येक मूल आनंदून जाऊ लागले आणि आपण करत असलेला संग्रह व आपली ही संपत्ती खरेच किती छान आहे असा अभिमान वाटू लागला. मुलांचा हा खजिना घरच्यांना कचरा वाटत असतो. घरात कुठेतरी अडचण वाटत असते. वेळप्रसंगी मोठी माणसे त्यांना रागवतात, पण मुले आपला हा खजिना सोडायला तयार नसतात. या सर्व कचऱ्यात या चिमुकल्यांचा जीव गुंतलेला असतो. त्या कचऱ्याची मुलांच्या दृष्टीने किंमत असते. घरात ज्या गोष्टींना अडसर आणि कचरा समजला जातो, तोच कचरा आणि अडसर आपल्या शाळेतील गुरुजी वर्गात सर्व मुलांसमोर

मांडून आपले कौतुक करतात आणि फूल देऊन स्वागत करतात ही गोष्ट माझ्या मुलांसाठी खूप मोठी ठरत होती. खरे तर मी यात नवीन काहीच करत नव्हतो. मुले मोडक्यातोडक्या वस्तूंसोबत दोस्ती करत होती. त्यामधूनच नवनवीन गोष्टींचा शोध घेत होती. त्यांच्या या वृत्तीला शोधून प्रेरणा देणे हे मोठ्यांचे काम असते. ही संधी मला मिळालेली आहे, एवढेच माझे काम.

एके दिवशी शीतलनेही आपला खजिना आणला. तिने लग्नपत्रिकांवरील चित्रे काढून त्याचे चिकटबुक बनवले होते. तिने जमा केलेला तिचा इतरही खजिना आणला होता. करणने वेगवेगळ्या कागदी वस्तू बनवून आणल्या. करणने बनवलेले सुंदर विमान, उड्या मारणारा कागदी बेडूक, कागदी फुले, पंखा हा त्या दिवशीच्या दाखवण्याच्या सोहळ्यातील चर्चेचा विषय ठरला. कधीतरी शाळेच्या वरून जाणाऱ्या विमानाचे मुलांना आश्चर्य वाटायचे. आज करणने तसेच विमान बनवून आणले होते. कागदी बेडूक मात्र नवीन वाटला. मुलांचे कला प्रावीण्य अद्भुत असते. आपण मुलांना अभ्यासाशिवाय इतर गोष्टी समजून घेण्यासाठी संधी मिळवून देत नाही. त्यामुळे मुले मोठी झाल्यावर स्वतःपुरताच विचार करू लागतात. याचे गूढ हे बालपणातच आपल्याला सापडते. खुशी आणि साक्षीचा खजिना या सर्वांपेक्षा वेगळा होता. त्यांनी मोडक्यातोडक्या वस्तूंचा तर संग्रह केला होताच, शिवाय त्यांनी परिसरात सापडलेल्या वेगवेगळ्या वनस्पतींच्या बिया जमा केल्या होत्या. चिंच, बोर, आंबा, सीताफळ, रामफळ, लिंबू, काजू, बदाम, करंजी, तूर, गहू, ज्वारी, अशा वेगवेगळ्या बियांचा संग्रह टेबलावर मांडल्यानंतर तो उठून दिसू लागला. वेगवेगळ्या रंगातील व वेगवेगळ्या आकारांच्या बिया पाहून मुले कुजबूज करू लागली. आंब्याची कोय हातात घेऊन स्वाती म्हणाली, ''इतलुशी कोय अन्, किती मोठे आंब्याचे झाड होते ना गुरुजी.'' ईश्वरी लगेच म्हणाली, ''या बियांतून झाड कसे येत असेल!'' साक्षी म्हणाली, ''सीताफळामध्ये एवढ्या मोठ्या बिया कशा येत असतील?'' मुलांची बियांवरील कुतूहलात्मक, तुलनात्मक चर्चा मनाला खूप स्पर्श करून गेली. मुलांनो, ''झाड कसे तयार होते ते आपण लवकरच पाहणार आहोत.'' असे म्हटल्याबरोबर सर्वांनी टाळ्या वाजवल्या. एके दिवशी सर्व मुलांचा हा खजिना वर्गामध्ये व्यवस्थित लावून त्याचे प्रदर्शन भरवले आणि शाळेतील सर्व मुलांना ते पाहायला खुले ठेवले. प्रत्येक मूल आपापल्या खजिन्याजवळ जाऊन बसत होते. आपल्या खजिन्याविषयी बोलत होते. त्या वस्तूंशी त्यांची दोस्ती होती. या सर्व किडुकमिडुक वस्तूंनाही ती जीव लावत होती. हे सर्व पाहून मुख्याध्यापक म्हणाले, ''हे सर्वच आपले उद्याचे खूप मोठे कलावंत आहेत.'' मुख्याध्यापक व इतर सर्व शिक्षकांनी मुलांचे स्वागत केले. मुलांनी जमवलेल्या या खजिन्याची सर्वत्र चर्चा होती.

खरेच किती संग्रहशील असतात ही मुले! प्रत्येक मुलाचा अगदी बालपणापासूनच संग्रह करण्याचा स्वभाव असतो. काहींच्या बाबतीत हा प्रकार वयानुरूप वाढत जाऊन पुढे छंद बनतो. या संग्रहात्मक वृत्तीला वळण देता आले, संग्रह कशाचा करायचा का करायचा, कसा करायचा याची दिशा देता आली, तर यात मुले गुंतून राहतील आणि आपल्याकडील जमा संपत्तीचा आनंद घ्यायला शिकतील. असा कृतिशील विचार मनात घोळू लागला. भविष्यात या मुलांच्या संग्रहात्मक वृत्तीला नक्कीच वळण देऊया असे ठरवले.

खिशात कोंबायला फुटक्या-तुटक्या वस्तूंची ददात मुलांना तरी भासू नये. गरीब-श्रीमंतीचा भेद मुलांमध्ये तरी असू नये, असाच जणू ईश्वराचा हेतू दिसतो. खिशात कोंबायला वस्तू नाहीत असा दरिद्री मुलगा शोधून तरी सापडेल का?

# Five Techniques of Teaching English

**Sujit Falke**
Z. P. School, Govind Nagar, Tal. Soegoan, Dist. Chh. Sambhajinagar.

*This success story focuses on different techniques to be used in teaching-learning English. These techniques will definitely help you to develop basic skills of English language.*

**Title of the initiative :**

Our Five Techniques of Teaching Methodology of English.

**Objectives of the initiative :**

(1) To develop children's English language from pleasant learning.

(2) To delimit the denomination of English language.

(3) To use of Gamification to make language learning easy.

(4) To give practice of speaking in English.

(5) To create healthy atmosphere to learn English language in the school.

(6) To help the students to become habitual for writing and reading skills.

(7) To start a healthy competition for English topic at school.

**Nature of implementation :**

Z. P. School of Govind Nagar, Varthan Cluster Banoti Block Soegoan, District Chh. Sambhajinagar changed the teaching methods of English subject to remove the fear from students mind. The teachers have decided 5 basic techniques for teaching English. We have observed improvement in students learning. Today our students surely compete with English medium students. the experiment had implemented on 8 students from English medium who have started learning English along with Marathi language. We are really happy to teach such English medium students. It shows that the mentality of village is changing rapidly and we are successful in achieving it.

The first stage of our five techniques is spell check exam.

**(1) Spell Check Exam :**

In that exam. I to IV standard students participated. From Monday to Friday, students sequentely reciting the spellings of objects, animals, fruits, vegetables, verbs, parts of body, action words, numbers with their meanings. Every Saturday, from 9:00 am to 9:30 am, students have to write whatever spellings they remember. Those who write more spellings will be the winners. On the occasion of Republic Day, three winners from every standard will we awarded.

**Advantages :**

(1) All students participated in it.

(2) Students prepared for reciting.

(3) Due to prize they worked hard.

(4) Developed English language recitation skill.

(5) Students become habitual for writing and reading skills.

(6) Developed good handwriting.

(7) Due to proper spellings students developed their confidence.

(8) The fear of English had disappeared.

### (2) Co-learning method :

Co-learning is an important part in English. We divide the students in two groups. In that one student is slow learner and the other one is fast. It develops the scale of slow learner student as like excellence student and excellence students get more exposure of practice students identified all the equipment from the cascade when they forget then their teacher help to them elocution, poems, questionnaire, self identity all these activities where conducted. Card reading, sentence construction, matching sets. It gave them enjoyment. We found such good and mature bonding between those students how are participating in co-learning method.

**Advantages/Benefits :**

(1) Students became confident.

(2) They started speaking in English.

(3) Developed new vocabulary.

(4) Students became fond of English.

(5) Students developed interacting skills with their friends.

(6) Students started learning along with their classmates.

(7) Students used English toolbox effectively.

(8) To achieve the target they started competing with each other.

### (3) Collective Group Reading :

Reading skill should be having well understanding. On Wednesday and Saturday, we divided the students into groups for reading whatever taught in the class that topics were read in that activity. It includes unfamiliar words become familiar with students even first standard students also read in English.

**Advantages :**

(1) Developed reading habit.

(2) Read unknown words effectively.

(3) Improved collective reading activities.

(4) Developed clear pronunciation and confidence.

(5) Developed reading speed.

(6) Students started reading carefully.

(7) The inferiority complex became very less.

### (4) Demonstration :

Student like to participate in drama and also watch the dramatic skits. To involve every student we develop very small dramas for example the here and tortoise, sky is falling, malhar and golden fish etc. Demonstration method helps to develop interest in English language. Student started participating well. We also found that fear about subject is disappeared.

**Advantages :**

(1) Created interest in English

(2) Developed more competition in school.

(3) Students started learning with acting.

(4) Students acted in daily routine activities.

(5) Helped to boost their confidence.

(6) Created healthy atmosphere with English language.

### (5) Read to me App :

It is an important stage in learning English. This app is used by 100 percent students who belongs to remote areas. Children were liberal because parents were uneducated and do not afford Android phones. Due to this app students started their reading properly. It helps in collective reading and also useful in spell check exams. Our IV standard students learnt about how to connect blue-tooth to speaker and the connectivity.

**Advantages :**

(1) Students understood every concept.

(2) They learnt pitch level of sounds.

(3) students became techno savvy.

(4) Students developed listening skill.

All these five techniques help in teaching English at Z. P. Schools as well as other schools also students started developing vocabulary by listening properly. We want to work more on these techniques so it would be helpful for enriching our students competence in English. We have strong faith on our efforts.

(5) Duration of the initiative - One year

(6) Outcomes :

**(I) Individual level (Students)**

(1) Every students get chance to involve in all English learning activity.

(2) The surprising progress in English skills.

(3) Each child participate in different activities of English.

(4) The companion had fun of learning by the English dynamics and English poems.

(5) They learn techniques to use technology.

**(II) Institutional level (School)**

(1) The graph of students development in English is increased.

(2) Students delivered the speech in English in cultural activities.

(3) English medium students from Village started seeking admission in Z. P. School Govind Nagar.

(4) Parents of students were also happy with this initiative.

(5) Students read in English fluently and parents felt proud of their children.

(6) People's mind set became positive towards English language.

(7) Fear of English language is vanished.

(8) Everyday English subject was taught in the class in active manner.

(9) All instructions in schools are given in English.

(10) We develop their skill of English in happy atmosphere and with the help of different games.

**Success of the initiative :**

(1) 'Jeevan Gaurav' Magazine is included all the information of this article in 2023.

(2) I give all information about the activities in all schools in teachers council program and other school also follow such kind of activities in their school.

(3) Many teachers approach towards me about the implementation of these techniques.

(4) Standard IV class declared as excellent class.

(5) Students developed their vocabulary of English.

(6) Students started searching words for different objects in English with curiosity.

(7) Students handle technology instrument very properly.

(8) Students developed self learning technique.

(9) School has developed excellence in learning.

**How can we universalize this success story ?**

I always try to universalize my teaching methods through the social media and other sources of multimedia. All these five techniques help in teaching English at Z. P. Schools as well as other schools also students started developing vocabulary by listening properly. I also wrote in the magazine name as 'Jeevan Gaurav' on these techniques. We want to work more on these techniques so it would be helpful for enriching our students competence in English. We have strong faith on our efforts.

## इतिहासाच्या पानांवरून

**श्रीकांत चौगुले**
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

# सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण विचार

सुरुवातीच्या काळात शालापत्रकाच्या अंकात संपूर्ण मराठी भाषकांचा विचार केलेला दिसतो. देशात जिथे जिथे मराठी शाळा आहेत किंवा मराठी संस्थानिक आहेत, त्यांचे वृत्तांत दिलेले दिसतात. बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक सुधारणांचे अनेक वृत्तांत शालापत्रकात पाहायला मिळतात.

सयाजीराव गायकवाड यांचे मूळनाव गोपाळराव काशीराव गायकवाड. १८८१ मध्ये ते बडोद्याचे महाराज झाले. त्यांनी आपल्या संस्थानात अनेक सुधारणा केल्या. १८९३ मध्ये त्यांनी सक्तीच्या शिक्षणाची योजना सुरू केली. त्या वेळी त्यांनी केलेले भाषण फेब्रुवारी १८९३ च्या शालापत्रकाच्या अंकात संक्षिप्त रूपात देण्यात आले आहे. समाजात उच्च-नीच असा भेद न करता, सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणानेच देशाची सुधारणा होणार आहे, त्यासाठी सर्वांनी शिकले पाहिजे, असे आवाहन करतानाच त्यांनी त्या काळात संस्थानाच्या शाळेत ८८७ अंत्यजाची व ७०२५ कोळी व अन्य जातीतील मुले शिक्षण घेत असल्याचे सांगून, त्यांचे कौतुक केले आहे.

तसेच ते मुला-मुलींच्या शिक्षणाविषयी आपल्या भाषणात पुढे म्हणतात,

''सांप्रत काळी शेकडा ४० विद्यार्थी स्वसंतोषाने आणि उत्साहाने विद्यादानाचा लाभ घेतात. हे त्यांच्या आई-बापांस आणि पालकांस भूषणास्पद आहे. मुलींच्या संबंधाने इतकी संतोषकारक स्थिती नाही. बहुधा कनिष्ठ मानलेल्या जातीच्या स्त्रिया विद्यादानाचा जास्त लाभ घेत आहेत. वरिष्ठप्रतींच्या लोकांनी इकडे लक्ष दिले पाहिजे. मुलगे शाळेत पाठविण्यास आई-बाबांची सुप्रसन्न मर्जी असल्याचा सर्वत्र अनुभव आहे; परंतु मुलींच्या संबंधाने विचार करता आई-बाबांची उदासीनता असल्याचे दिसून येते. स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रत्येक कुटुंबास फायदा होणार आहे, कारण शिक्षणाने संसारास साहाय्यता होईल. मुलींच्या हिताकडे दुर्लक्ष करणे, लोकसमाजाच्या स्वार्थपरायणतेचे दर्शक होय. अर्थात स्त्रियांच्या शिक्षणासाठी फार काळजी घेतली पाहिजे. सध्या शेकडा चारच मुली विद्यामंदिरात असल्याचे दिसून येते; परंतु शेकडा ९० मुली शाळांत जात आहेत, असे ऐकण्याची माझी इच्छा आहे. ती पूर्ण होणे बहुतांशी लोकसमूहावर अवलंबून आहे. कोणत्याही देशाची कायमची सुधारणा म्हणजे त्यातील राजापासून रंकापर्यंत यच्चयावत लहानथोर स्त्री-पुरुषांस योग्य विद्यादान देणे हे होय.''

सयाजी महाराजांनी बडोदा संस्थानात अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शिक्षणविषयक केलेल्या सुधारणा, सक्तीचे शिक्षण आणि स्त्री शिक्षणाचा त्यांचा दृष्टिकोन यामधून दिसून येतो.





महाराष्ट्रातील सैनिकी शाळांचे धोरण ठरवण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी परिषदेचे सहसंचालक मा. रमाकांत काठमोरे, मा. हरूण अत्तार यांचेसह सर्व अधिकारी तसेच महाराष्ट्रातील प्रत्येक सैनिकी शाळेचे प्राचार्य तथा प्रतिनिधी उपस्थित होते.















'लोकसंख्या शिक्षण' कार्यक्रमांतर्गत 'राज्यस्तरीय लोकनृत्य व भूमिका अभिनय स्पर्धा' दि.२७ ऑक्टोबर, २०२३ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले सभागृह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे संचालक, मा. श्री. अमोल येडगे, सहसंचालक, मा. श्री. रमाकांत काठमोरे यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने आयोजित करण्यात आली होती. यामध्ये राज्यातून १६ संघ भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धेसाठी सहभागी झाले. ८८ विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेत सादरीकरण केले. ३२ शिक्षकांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले.

Date of Publication : 1 November, 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th November, 2023
at GPO, PSO, Pune - 411 001.

**'Registered'**

RNI No. 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**




'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम' (NILP) दि. १६ ते १७ ऑक्टोबर, २०२३ राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत 'वाटचाल प्रगतीची' व निपुण भारत - 'गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम संशोधन अहवाल' हस्तपुस्तिकेच्या अनावरण प्रसंगी
मा. ना. दीपकजी केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन,
मा. श्री. रनजित सिंह देओल, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन,
मा. श्री. सूरज मांढरे, आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
मा. श्री. अमोल येडगे, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे,
मा. डॉ. महेश पालकर, शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र, पुणे,
मा. श्री. शरद गोसावी, संचालक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे,
मा. डॉ. इम्तियाज काझी, सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र,
मा. डॉ. संपत सूर्यवंशी, संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे.

यावेळी राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत
मा. डॉ. नेहा बेलसरे, उपसंचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,
पुणे यांनी उपस्थितांशी राज्य साक्षरता केंद्रांतर्गत चालू
असलेल्या विविध कार्यक्रमांविषयी संवाद साधला.



पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ____________________
____________________
____________________
____________________